डॉ. नितीन मोरे



॥ संत मिकाराम गाथा ॥

अर्थात मिकाराम चाळिशी

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

॥ संत मिकाराम गाथा ॥

अर्थात मिकाराम चाळिशी

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ,
वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

मुखपृष्ठावर आपल्या छायाचित्राचा वापर करू दिल्याबद्दल स्नेही

डॉ. संदीप कसबेकर

यांचे मनापासून आभार

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration.

Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahlty.com

esahlty@gmall.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- ७ नोव्हेंबर २०२५

©esahlty Pratlshthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे साठावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

Moblle No. 98209 37490, 98696 73415.

Emall - drnmore@yahoo.com

।। संत मिकाराम गाथा ।।

अर्थात मिकाराम चाळिशी

डॉ. नितीन मोरे

।। संत मिकाराम गाथा ।।

प्रस्तावना

१.

महाराष्ट्रास मोठीच संत परंपरा आहे. त्यांचे अभंग नि शिकवणूक यांचा मोठा प्रभाव आहेच. तरीही भक्तीच्या मोठ्या बाजारपेठेत मधूनमधून नवनवीन संत येत असतातच. नव्या जमान्याची मागणी असेल तर पुरवठा होणारच. खरेखुरे संत जीवनोपयोगी प्रॅक्टिकल शिकवणूक देत नसतील नि नुसताच आदर्शवादी उपदेश करत असतील तर या मार्केटमध्ये संत मिकारामास चांगलाच वाव असणार. त्यामुळे संत तुकारामांसारखाच पण आजचा संतश्रेष्ठ मिकाराम आपली अभंग रचना करण्यात दंग आहे. त्याने ही नवीन गाथा लिहिली आहे. सामाजिक राजकीय अभंगांबरोबरच हा संत सरतेशेवटी स्वत:स संतश्रेष्ठ घोषित करून मार्केटिंगचा ही आदर्श घालून देत आहे.

उपरोध हा युएसपी असलेल्या संत मिकारामाच्या या चाळीस अभंगांचा 'मिकाराम चाळीशी' नामक संग्रह. वाचावा असा आग्रह धरावा इतपत वाचकांस पसंत पडावा ही अपेक्षा.

२

मिका सेज ..

तुकया लिहीत । रोजच अभंग
त्यास न करे भंग । हा मिका ॥

नाही टेकडारिकाम । मिका तसा बिझी
पण लिहावया तो राजी । सर्सावुनी ॥

करेन म्हणतो तो । डेली अभंगरचना
नका आलोचना । प्लीज करू ॥

वाटे सोपे त्यास । हे शब्दजुळव
न समजावे गळू व । अनिष्ट जागी ॥

लिमिटेड वाचकांनो । धरुन संयम वाचा रे
उगा न हाकारे । करा व्यर्थ ॥

प्रयत्नांती परमेश । मिळतो जर कुठे
अभंगी अर्थ येथे । मिळेलचि ॥

मिका देतसे प्रॉमिस । कसा थोर राजकारणी
वेळ सत्कारणी । लावितसे ॥

वाचकांनो करा रे । इतके उपकार
वाचायचा रे उपचार । पाळावाचि ॥

विषयांची नसे काही । कमी संत मिकास
उगाच मिजास ॥ समजो नये ॥

द्यावे कान इथे । संत मिका असे थोर
नव्हे कुणी पोर । समजूनी घ्या ॥

लिहिण्यात याच्या । शोधता सापडे अर्थ
वेळ जाईल सार्थ । मिका सेज ॥

डॉ. नितीन मोरे

॥ संत मिकाराम गाथा ॥

अनुक्रमणिका

१. अरे देवा
२. व्यवहार
३. धन, संपत्ती इ.
४. जात जाता
५. आम्ही जात्याभिमानी
६. जातिभूषण
७. आपली रेषा
८. श्रद्ध अश्रद्ध
९. भावना अन अस्मिता
१०.हाताची घडी
११.गर्वाचिये घर
१२.नवे विद्वज्जन
१३.नवी पत्रकारिता
१४.चर्चा ए चॅनेल
१५.विश्ववृत्त
१६.शक्तिमान
१७.सदा सर्वदा
१८.दही हंडी
१९. फलकसम्राट!
२०.करियर
२१.द्वेषोद्वेषी
२२.बोलाचिच कढी
२३.नेता
२४.निष्ठावंत
२५.पक्षांतरातुर
२६.माझिया मंत्रीपदाचे गायन
२७.सांभाळ खुर्ची सांभाळ
२८.बनलो मंत्री पुढे काय?
२९.सत्तासोपान
३०.सापशिडी
३१.खुर्ची
३२.विकास गंगा
३३.जनाचे श्लोक
३४.असत्यमेव जयते
३५.इये राजकारणाचिये नगरी
३६.सत्तामेव जयते
३७.पुतळे
३८.होयबा व्रत
३९.संतश्रेष्ठ
४०.संत, बाबा, बुवा इ.

१.

अरे देवा..!

षोडशोपचारे । आटपावी पूजा
त्यानंतर दुजा । लागावे कामासी ॥

सकाळसकाळी । प्रार्थना देवाची
आठवण तयाची । काढावी ॥

आटपावी अर्चना । यथासांग आणि
हातावरोनि पाणी । सोडावे ॥

कर्तव्य अत्युच्च । देवधर्माचरण
त्यानंतर आचरण । करा कसे ॥

देवधर्म करा । करा कर्मकांडादि
मग आचरण आदि । कसेही असो ॥

पूजा अर्चेतूनचि । मिळत असे पुण्य
बाकी सारे गौण । असे येथे ॥

दैनंदिन बाबी । तयात न लुडबुड
देवाने न गडबड । करावी तेथ ॥

आम्ही करू काही । भ्रष्टाचार थोडाफार
देवाने विचार । न करावा त्याचा ॥

केली असे पूजा । दररोज ती अर्चना
अजून याचना । कसली देवा?

देवाचे न करू । याहुनि लाड अति
भक्तांविन ना गति । त्यास असे ॥

देवाजीने असे । देव्हाऱ्यात रहावे
पूजेअर्चेकडे पहावे । तयाने फक्त ॥

आटोपता पूजा । आम्ही मोकळे
न काढावे गळे । आचरणालागी ॥

आम्हा असा असे । देवाजीच्या भक्ता
वागण्याचा मक्ता । मिळे कसाही ॥

धार्मिक हो आम्ही । करू फसवणुक
देऊ वागणूक । कुणा हीन ॥

तरीही न लागे पाप । काहीच आम्हास
कारण देवास । भजतो आम्ही ॥

देवाजीची करू । दररोज ऐसी सेवा
त्यातूनि मेवा । मिळेलचि ॥

मग केला काही । आम्ही अनाचार
थोडा भ्रष्टाचार । तरी चाले ॥

देवा नको पाहू । उगाच इकडे
तुझ्या देव्हारी तिकडे । दिला नैवेद्य ॥

नाहीत समान कोणी । न समान पाच बोटे
जगी छोटे मोठे । असायाचेच ॥

उगा का म्हणावे । लेकरे तुझीच सर्व
मग स्व जातिधर्म गर्व । धरावा कैसा?

कधी देवाजीस । नवस बोलता
पाकिट खोलता । त्याच्यासाठी ॥

देवा तू मुकाट । पुरव तो नवस
मग पेमेंट खास । येईलचि ॥

कोण म्हणे देव । भुकेला भक्तिचा
उगा का सक्तीचा । रामराम?

आता देवाजीस न । पुरे फक्त भक्तिभाव
त्यात काही देवघेव । असावीच ॥

अरे असला देव । मनुष्याचे त्याचे गुण
अथवा अवगुण । मनुष्याचाचि ॥

देवाजीचे स्थान । फक्त देव्हाऱ्यात
दैनंदिन जीवनात । उपरा तो ॥

देवाने कसे । रहावे देवासारखे
मनुष्यासारखे । वागू नये ॥

माजवावे देव्हारे । बसवावे देव्हारी
असा व्यवहारी । असे मनुज ॥

मिका म्हणे करा । पूजा नि अर्चना
लागावे भजना । भगवंताच्या ॥

पण न लागावे फार । त्याचिया भजनी
सोयिस्कर आचरणी । करावित ॥

मिका म्हणे देवा । तू मूर्तीतच बरा
उगाच का करा । खरे खोटे?

२.

व्यवहार

कबीर एकनाथ । तुकाराम ज्ञानदेवे
एक काने ऐकावे । सोडोनि द्यावे ॥

सारे संतसज्जन । उरती उपचारापुरता
अन भक्तीपुरता । उरले काही ॥

तयां मानावे भगवंत । आणि अवतार
हा शिष्टाचार । पाळावाचि ॥

ऐकावी शिकवण । भक्तीभावे ग्रहण
तयास देव जाण । अन द्यावे सोडुनि ॥

आम्ही न उद्धटउद्दंड । करू देवाशी बरोबरी
पाडावे न भरी । त्यासाठी आम्हां ॥

ते संतश्रेष्ठ । ते ईश्वरीय अंश

शिकवणुकीचा दंश । न घडू द्यावा ॥

उभारावी त्यांची । मोठमोठाली देऊळे
उगा तयांची देवळे । न माजवावी ॥

ते होते संतच । होऊनि गेले ते महान
आपण लहान । कशी होई बरोबरी ॥

जगाच्या कल्याणा । तयांच्या विभूती
कपाळी विभूती । लावावी फक्त ॥

तयांची शिकवण । काय आचरावी
उगा का करावी । बरोबरी ॥

संत सज्जनांस । न दुजे काम
सोडोनिया धाम । शिकविती ॥

तयांस न लागे । निभवणे दुनियादारी
रोजीची उधारी । आपणासचि ॥

सर्वव्यापी व्यवहार । आणिक लागे धन
तेथे हे सज्जन । न कामा येती ॥

मुखी त्यांचेचि नाम । सुरू ठेवावे काम
नको तो विश्राम । दुनिये दारी ॥

उत्तम ते धन । अतिउत्तम तो मान
हेचि तू जाण । दुनिये दारी ॥

येनकेन प्रकारेण । जोडोनिया धन
असा अविचारे । वेच करी ॥

जगी सर्वापुढे । असू द्यावा स्वार्थ
त्यापुढे अनर्थ । घडो नये ॥

कुणास बिनधास्त । पाडावे तोंडघशी
कधी पाडावे फशी । द्रव्यालागी ॥

जगी सर्वाभूती । द्रव्य हेच जाण
उगाच अजाण । बनू नये ॥

संतांची शिकवण । न जावे वाहून
उगाच पाड न । कुऱ्हाड पायी ॥

आधी पोटोबाचि । स्वत:चेचि पोट
त्यासाठी मोट । बांधावीच ॥

विठोबा येईल । त्याचिया मागुती
ठेवोनि निगुती । करावी पूजा ॥

भरल्या पोटी करी । थोडासा परमार्थ
जगी जाण स्वार्थ । परमोच्च ॥

मिका म्हणे बा ऐक । मनुजा सामान्य
मिका देई असामान्य । व्यवहारी ज्ञान ॥

३.

धन संपत्ती आदि..

दाम धन संपत्ती । उद्दिष्ट एकचि जाण
तयांसाठी ताण । आयुष्य हे ॥

धनाढ्यांइतुका न । मिळे कोणा मान
ठेवावे ते भान । सदा एव ॥

एक एक जोडोनि । व्हावे धनवान
तोचि सामर्थ्यवान । समजावा ॥

पैसा तो पैसा । न ठेवावे भान
याच्याविण मान । मिळेनाचि ॥

येईल तितुका । जमवावा ओरपुनि
आणावा जीवनी । अर्थच अर्थ ॥

घेता किती घेशी । उघडुनि दोन हात

घ्यावा आखडुनि तोच । देण्यालागी ॥

याच्या वाचोनि न । हाले कुठे पान
करी जिवाचे रान । याचसाठी ॥

वसविली दुनिया । धनवानासाठी
संपत्तीच्या पाठी । रहावे सदोदित ॥

पैसा बोले ऐसा । तोच चालवे जग
सांगा कैसे मग । फिरवा तोंड?

जीवनाचे उद्दिष्ट । अन इतिकर्तव्यता
धनातचि जाणता । रहावेच ॥

उगा न करावा । कसलाचि बाऊ
जाऊ तेथे खाऊ । हेचि यथार्थ ॥

उगा न करावे । विचलित चित्त
जमवीत वित्त । जावे पुढे ॥

साधनशुचितादि । अगदीच थोतांडे
उगा वेंगाडुनि तोंडे । बोलू नये ॥

या दमडीपुढती । नव्हे मोठा कोणी
समजावे झणी । दुनियेत ॥

सारे काही येथ । फिरे तयाच्या भोवती
त्यापुढे शरणागती । पत्करावी ॥

जोडावेचि धन । कोणत्याही प्रकारे
बिनधास विचारे । वेचित जावे ॥

ये रे ये रे पैशा । आभाळ जमिनीतुनी
करूनी उत्खननी । जमवावा ॥

पैसा तो कमवावा । पैसा तो ओरबडावा
पैसा तो साचवावा । तिन्ही त्रिकाळी ॥

पैसा तो साठवावा । पैसा तो वाढवावा
पैसा तो माजवावा । सर्व काळी ॥

पैशाने जमवी मत्ता । पैशाने येई सत्ता
ऐशी तयाचि महत्ता । तूच जाण ॥

झाला धनवान । म्हणवील तो महान
त्यापुढे लहान । नीतीमंत ॥

श्रीमंतच चालवती । जगाची रहाटी
येऊ द्यावी ओहोटी । नीतीमत्तेस ॥

नीतीअनीती न लागू । कोणत्या धनास
सांगावे मनास । कुरकुरणाऱ्या ॥

संपत्ति संवर्धन । येणकेण प्रकारेण
तोचि एक जाण । सामर्थ्यशाली ॥

विचारसरणी साधी । उच्चतम राहाणी

हीच खरी कहाणी । आज असे ॥

साध्या राहणीचे । उगा न कवतिक
होऊनि गेले ते कितीक । कुणा आठवती?

बना रे श्रीमंत । आणिक उन्मत्त
सत्ता अन सत्य । हेचि असे ॥

ज्याच्या हाती असे । पैशांचा बटवा
त्यानेच खेळवा । सर्व जगासि ॥

पैसा नसे गोरा । पैसा नसे काळा
समजुनि बाळा । वागावेचि ॥

ज्याच्या हाती धन । तोचि देई आज्ञा
इतरांची प्राज्ञा । काय असे?

बनावे धनाढ्य । बनावे सामर्थ्यवान
बनावे जगत्वाहन । ऐसे करावे ॥

मिका संत श्रेष्ठ । जमवीत माया
नको जाया वाया । संत जन्म ॥

दाम करी काम । नव्हे, दामच करी काम
सांगे हा मिकाराम । आता ठेवावी दक्षिणा ॥

४.

जात जाता..

जात जाता अरे काय राही ।
विचारी मना बा शोधून पाही ॥

जातीसंग अभिमान जन्मासी आला ।
तयावरी कुणी ना घालील घाला ॥

जात्याभिमान बाळगी बा तू ऐसा ।
जाता तो उरेल काय न कैसा ॥

कित्येक पिढ्यांत ती टिकोन आहे ।
विचारी मना तू डोळे उघडून पाहे ॥

नको रे ध्यान देऊ कुणा सुधारकाशी ।
उगा बडबडीहून काय असे त्या पाशी ॥

वर्षानुवर्षे सिस्टीम ही टिकून राहे ।
यातच पहावे यातच अर्थ आहे ॥

जातीसाठी माती खाऊनी घे रे ।
बघुनी मती गुंग होऊ न दे रे ॥

जातीबाह्य कुणी का उगाच जाई ।
विवाहास तयार कोणी का रे होई ॥

हिच्यासाठी पाडी चार दोन तू खून ।
जातीबाहेरी विवाह ही समजोनि खूण ॥

मनुष्य मेला तरी चालताहे ।
जाती करिता हे न साहताहे ॥

माणसाहुनी श्रेष्ठ तयाची जात ।
समजुनी घे रे अपुली जमात ॥

बनवावी अशी पचांयत श्रेष्ठ ।
तीच एक श्रेष्ठ बाकी सारे कनिष्ठ ॥

जरी शंका तुज तुझ्या मोठेपणाची ।
इतरांस समज हीन ही खूण महानतेची ॥

मनुष्य जाती एकचि नसे रे ।
श्रेष्ठ कनिष्ठ देवे निर्मिले रे ॥

अशी चालवावी ती जातीव्यवस्था ।
तिच्याविण काय होईल रे अवस्था ॥

भले म्हणो कोणी मनुष्य एक ।
रोटीबेटी व्यवहार का होईल नेक ॥

विचारी मना हेच समजून घे तू ।
जातव्यवहार जगण्यास जरुरी परंतु ॥

गर्वांधतेने मग देई घोषणा तू ।
स्वजातीहुनी न मोठा न किंतुपरंतु ॥

इतरेजन असती असे दीन हीन ।
बघशी उघडोनि डोळे किती ते मलिन ॥

सुधारका सोबतीने न वाहवत जावे ।
हीन प्रतिगामी प्रतिदिनी सांगत जावे ॥

अरे धर्मजाती विरोधक विघातकी ते ।
तयां बरोबरीने अधर्माचरण ये ते ॥

पाखंडी अधर्मी समजावे द्रोही तयांस ।
उगा न चढवावे वरी कोणी, घ्यावे सायास ॥

मिका म्हणे जात्यंधता श्रेष्ठ आहे ।
विचारी मना कोणासही विचारूनि पाहे ॥

५.

आम्ही जात्याभिमानी

आम्हां अभिमान । आमचीच जाती
महान प्रजाती । आमुचीच ॥

आम्हांहून सारे । असती लहान
आम्हीच महान । या जगती ॥

या जाती साठी । चला खाऊ माती
नवी जोडू नाती । जातीतच ॥

कुणी जाऊ पाहे । हिच्या ते बाहेर
आपुले ते हेर । पाठवावे ॥

बित्तं बातमी ती । काढावी अशी
नाती अशीकशी । जोडती ते?

प्रेमबिम नाही । आपुल्या संस्कृतीत
दाखवून कृतीत । आपुल्या द्यावे ॥

हवी तर उडवावी । आपुलीच माथी
जातीसाठी माती । खाणे इष्ट ॥

घरानेकी इज्जत । आम्हा असे प्यारी
म्हणूनी राजदुलारी । ऐक आमुचे ॥

अशी कशी फसविली । नादान ती लेक
न दिसे इरादा नेक । तयाचाचि ॥

सोड सोड मुळी । असला त्याचा नाद
नकोच विवाद । जातीबाह्य ॥

नाहीतरी करू का । त्यालाच सरळ
ओकून गरळ । सुधरीन ॥

किंवा करावा का । त्याचा शिरच्छेद
जातविजातीचा भेद । कळो त्यास ॥

इतक्या शतकांची । आमची संस्कृती
तिजसाठी ती कृती । करावीच ॥

अशानेच होई ना । जातीची प्रगती
त्यावाचुनी सद्गती । मिळेनाचि ॥

बहु असती जातीतरी । पण आम्हां अभिमान
कुणी म्हणा दुराभिमान । जातीचाचि ॥

कुणी म्हणा जात्यंध । कुणी म्हणा काही
जात्याभिमान नाही । जाणे कधीच ॥

होय आम्ही खाऊच । जातीसाठी माती
कुणाची गुंग मती । मिका म्हणे ॥

६.

जातिभूषण

आम्हां पुसशि काय आम्ही जातभाई ।
आमुच्या सारिखे बा कुणी अन्य नाही ॥

मनुष्यास देवे असे भिन्न केले ।
तयासाठी किती मारिले किती मेले ॥

व्यवहार तो त्रिकालाबाधित जात ।
मरे जीव जात, न जाईल जात ॥

असे आपुलेचि असे ब्रीद साचे ।
गुणगान गावे गा सदा स्व वाचे ॥

आनंदे भक्षावी गा जातीची माती ।
जया जात्याभिमान तेचि ऐशी खाती ॥

मारावे कुणा नि कीर्तीरूपी उरावे ।
दुज्या जातीच्या ते उरा वरी बसावे ॥

स्वजात सोडुनि दुजा तोचि हीन ।
जातीवीण मानव, जलाविन मीन ॥

अभिमान असावा तटतटावी शिर ।
दुज्याचे का न उडवावे ते शीर?

परक्यास मानूनी ठेवावेचि दूर ।
धर्म बुडविण्याचा लावूनी सूर ॥

कुणी करी व्यवहार जो रोटी बेटी ।
नको भ्रष्ट धर्म नको वागणूक खोटी ॥

आपुली बेटी ती आपुल्यात द्यावी ।
का परजाती प्रतिष्ठा आपणचि द्यावी?

कुणी सांगे सारी लेकरे ईश्वराची ।
जातपात ही निर्मितीच रे त्याची ॥

कुण्या सुधारकाच्या न फशी पडावे ।
संधी मिळताच मुंडके त्या उडवावे ॥

सुधारक जाणावा तो समाज दूषण ।
जात्याभिमानी एकचि असे गा भूषण ॥

मिका म्हणे मानी अन तोचि ज्ञानी ।
खरा समाजभूषण तो जात्याभिमानी ॥

७.

आपली रेषा..

कुणाही नसावा । कसला संशय
आम्हीच नि:संशय । आहो ग्रेट ॥

आम्हाच हा सर्व । बाबींचाच गर्व
असे हे पर्व । सुरू असे ॥

आमुचा धर्म । आमुचीच जात
आमुचाच पंथ । असे श्रेष्ठ ॥

असे श्रेष्ठ आणि । आमुचेच गाव
आमुचेच नाव । अति श्रेष्ठ ॥

असे ग्रेट ती जगात । आमुचीच गल्ली
म्हणतो हल्ली । आम्ही उच्चरवे ॥

बोळात इमारती । चाळ आमुचीच थोर
कुणी ही पोर । सांगेल ते ॥

चाळीतल्या घरांत । थोर अमुचाच मजला
संशय न मजला । यत्किंचित ॥

आमुच्या मजल्यावर । एक आम्हीच थोर
नको जीवा घोर । उगा काही ॥

थोडक्यात सांगू । आम्हीच थोर कसे
दातखीळ बसे । इतरांची ॥

न मानता तुम्ही तर । समजा इतरांस लहान
आपसूक आम्ही महान । बनू ऐसे ॥

मिका म्हणे नलगे । रेषा आपुलाली मोठी
इतरांची छोटी । होई पुरी ॥

८.

श्रद्ध-अश्रद्ध

मना प्रश्न श्रद्धेस पुसू नये तो ।
तया वास अश्रद्धेचाचि ये तो ॥

मना ना कुशंका मनी या धरितो ।
जनी तोचि श्रद्धाळू सिद्धी पावितो ॥

मना ना कशात शोधुनी पाही अर्थ ।
रूढी पिढीजाद न पाळिता अनर्थ ॥

मना पाळ रूढी परंपरा भक्ती भावे ।
उद्धारूनी पिढ्यांस ऋणी तेच व्हावे ॥

नको रे उगा लढवू वितर्क तर्क ।
झाकुनी नेत्र व्हावे रूढींत गर्क ॥

त्यातचि असे तुझी उन्नती ती ।
साधावी अशी आपुली प्रगती ती ॥

उगा सुधारकाचे काही ऐकू नये रे ।
कुणी सांगता कानी ऐकू न ये रे ॥

तया सुधारकांसी गप्प ते बैसवावे ।
भले कमरेचे डोईस ते नेसवावे ॥

तार्किक विचार फार जो करि तो ।
पाखंडास निमित्त तोचि तो देतो ॥

मना अश्रद्धांस माफ करू नये रे ।
तया चार अपशब्द करून ये रे ॥

मना तर्कसंगतीने न त्याच्याशी लढावे ।
अति जाहले तर तयास ते लोळवावे ॥

मना जाण रूढी परंपराची महती ।
वर्षानुवर्षे फुका का टिकूनी राहाती ॥

जनसामान्य कुणी त्यावरूनि पारखावा ।
मिका म्हणे श्रद्धेस बाजार रे दाखवावा ॥

९.

भावना अन अस्मिता

भावनांचे भाले । मारा रे फेकून
कुणाचे ऐकून । घेऊ नये ॥

उगारूनी अस्त्र । शस्त्र भावनांचे
इमले अस्मितांचे । उभारावे ॥

असो भावनाच । त्या संवेदनशील
त्यांपुढे अपील । नसे कुणाचे ॥

असति भावना । अति ज्वालाग्राही
असावे आग्रही । तयांकरिता ॥

अस्मिता बनाव्या । अशा टोकदार
नसावे उदार । या बाबींत ॥

अणकुचीदार । अन टोकदार

शस्त्र धारदार । असो दोहोंचे ॥

करावे काहीही । या अस्मितेसाठी
कुणी तिच्या पाठी । न लागे ॥

भाषा प्रांत राज्य । जात धर्म गल्ली
अस्मिता हल्ली । सदा जागती ॥

हळव्याच दोन्ही । अस्मिता भावना
उरात मावंना । अभिमान ॥

दुखावती दोघी । फट् म्हणता ब्रह्महत्या
हेची जाण सत्या । मिका म्हणे ॥

१०.

हाताची घडी अन ..

लहान बालका । हे शिकवावे
प्रश्न न विचारावे । कुणासही ॥

पाजावे तयास । बाळकडू भरपूर
आज्ञाधारकतेचा पूर । येऊ द्यावा ॥

म्हणावे नको रे । प्रतिप्रश्न उगा
फोडावा न फुगा । कोणाचाही ॥

मोठे जे सांगती । त्यात असे अर्थ
उगा रे अनर्थ । ओढवू नये ॥

घडी हाताची अन । बोट तोंडावर
जिज्ञासेस आवर । घाल बाळा ॥

असो द्यावी सर्वत्र । शांतता संपूर्ण
मोठे ते अपूर्ण । नसती कधी ॥

असे ब्रीद आपुले । पिनड्राॅप सायलेन्स
नसावा व्हाॅयलेन्स । मतभेदाचा ॥

प्रतिप्रश्नाची नसावी । उगा बेशिस्त
नाही रे प्रशस्त । समजूनि घे ॥

अंगी बाणव रे बाळा । ऐकणे निमूट
नको रे चिमूट । शंका घेणे ॥

असे होता होशील । पुढे असा नागरिक
असशी जागरूक । हुकुमान्वये ॥

निमूट पाळशी तू । मग वरिष्ठांचे हुकूम
उगा न खुमखुम । प्रतिप्रश्नाची ॥

बनशी सैनिक । हुकुमाचा ताबेदार
अन ते ठाणेदार । मालक तुझे ॥

धर्ममार्तंड । अन समाज धुरीण
सत्ताधीश जाण । त्राता तुझे ॥

बाळपणापासूनच । राहशी आज्ञेत
तुज घेतील कवेत । ऐक बाळा ॥

उगा कशास आपुले । शिणवावे शिर
तू न वेडा पीर । बन बाळा ॥

पाळ समाजनियम । हुकुम ही पाळ
मग का आळ । समाजद्रोही?

सारे काही जैसे । सांगितले पाळ
पायी बांधूनि चाळ । नाच ऐसा ॥

चला बालकांस । पाजू बाळकडू
घेऊनिया गडू । भरपूर ॥

बनशी तू बाळा । हुकुमी सैनिक
समस्या दैनिक । कधी न येती ॥

मिका म्हणे ऐका । कॅच देम यंग
मग कशास टंग । त्यांची देईल दगा?

११.

गर्वाचिये घर..

जेथे पहा तिकडे । पाने तीन पळसास
जरा पहा आसपास । नसे अपवाद ॥

चुली मातीच्याच । बनती घरोघरी
फिरून दारोदारी । बघुनि यावे ॥

म्हणे जगात या । एक सारखा दुसरा
अन्य न तिसरा । असे कुणी ॥

पडे जितका फरक । तितका तो असे सम
सांगे तो तुकाराम । मानूनी न घ्यावे ॥

कुणी ही नसावे । कधी यात समाधानी
स्वत:स ग्रेट मानी । हरेक जण ॥

मग म्हणे माझी श्रेष्ठ । जात भाषा वा धर्म
असो कसे ही कर्म । त्याचा न प्रश्न ॥

असो नसो स्वत: मोठे । माना इतरां कनिष्ठ
आपसूक स्वत: श्रेष्ठ । होई सिद्ध ॥

मग इतरांस पहावे । येताजाता ते पाण्यात
आपुल्या या बाण्यात । नको खंड ॥

असू द्यावा मनी । याचा त्याचा असा गर्व
स्वाभिमानाचे हे पर्व । करावे सुरू ॥

करावे प्रतिमा खंडन । मग सर्वगामी द्वेष
असू द्यावा असा त्वेष । मनोमनी ॥

प्रेम आपुलकी सहिष्णुता । गुण जाण कालबाह्य
यांचे न मुळी साह्य । स्व प्रतिमेस ॥

कुणी शहाणा सांगेल । कुणी जाई समजवाया
आपुला वेळ न वाया । दवडावा ॥

तो समजेल मारे । स्वत:सी सुधारक अग्रणी
त्यास शत्रू मेरूमणी । समजावे ॥

त्यास करावे घोषित । द्रोही समाज घातक
बुडत्या समाजाचे पातक । न घडो द्यावे ॥

बनावे कूपमंडूक । यातच असे उन्नती
अन्यथा प्रगती । घडे कैसी?

आपुलाले डबके । नव्हे तोचि सागर
त्यातचि घागर । भरत रहावी ॥

यास कुणी कुत्सित । म्हणो डबके मंथन
यातुनि न हलाहल । निपजेल ॥

करावे दुर्लक्ष । अथवा अपमान
स्वत:सच जाण । अतिश्रेष्ठ ॥

आपुल्या डबक्याचा । असो ज्वलंत अभिमान
त्यासच स्वाभिमान । म्हणोनिया ॥

तरीदेखील कुणी । अतिशहाणा निपजेल
स्वत:स म्हणेल । पुरोगामी ॥

अशांस न द्यावा भाव । अति होता साधा डाव
समाजहितासाठी राव । धाडा देवलोकी ॥

सहिष्णुता बंधुता । कसली मारे ती समता
अरे असे विषमता । पाची बोटी ॥

सर्वथैव ऐशा नरा । मोजून हाणाव्या पैजारा
सोडावे बेजारा । करोनिया ॥

असो अंध अभिमान । स्व अस्तित्वाचा कणा
उभारोनि तो फणा । डसत जावे ॥

असो कितीएक भाषा । जाती धर्म पंथ प्रांत
गर्व करण्यास न भ्रांत । पडे कधी ॥

गर्वाचे बांधावे घर । वसे सदा ते वरती
येऊ द्यावी ती भरती । एकेकास ॥

गर्वाचिये घरी । सुखसमृद्धी राज्य करी
काठोकाठ पाणी भरी । ऋद्धी सिद्धी ॥

मिका म्हणे हवाचि । कशान कशाचा गर्व
बाकी मग सर्व । मागे सोडावेचि ॥

१२.

नवे विद्वज्जन!

मना सोड रे बिंधास्त मतांची पिचकारी ।
असे मन निचऱ्यास रे ती हितकारी ॥

उचलण्यास जिव्हा तो विचार का करावा?
उगा सत्याचाचि आग्रह तो का धरावा?

जना व्यक्त होण्या कुणा व्यासंग नको रे ।
सत्यासत्याची चाड बाळगू तू नको रे ॥

बिनधास्त शिवराळ लिहिणे हितकारी ।
उद्धारावे मायबाप सुद्धा नको रे चुकारी ॥

द्यावे मत आपुलाले ते रेटून मारे ।
जमल्यास बिंधास खेटून मारे ॥

अभ्यासून प्रकटावे हा हव्यास नको रे ।
मत पिंक टाकावी, संधी सोडू नको रे ॥

बना व्हाॅट्सॅपी विद्वान, पंडित फेसबुकी ।
पाजळाया आपुले ज्ञान ही संधी फुकाफुकी ॥

टाक पिंक मतांची, तोड टांग आभासी ।
अरे गेले ते दिन प्रकटावे लागे अभ्यासी ॥

नको मक्तेदारी कुण्या वाचस्पती व्यासंग्याची ।
अरे मांडावे ठासूनी मत, न पुरे पासंगाशी ॥

नको ढुढ्ढाचार्य, नको तज्ञ मताधिकारी ।
आपुली ती मते ठोक समजुनी अधिकारी ॥

न जमता विचारी, देण्या शिवी चुकू नये रे ।
नंगे को डरता खुदा खुद्द, हे विसरू नये रे ॥

मिका म्हणे साल पिंपळास लावा वडाची ।
म्हणावे स्वत:स स्वघोषित ते सव्यसाची ॥

१३.

नवी पत्रकारिता ..

जो उनको हो पसंद । त्याच द्यावा गड्यांनो वार्ता
बाकी काही बाता । मारू नये ॥

उगा नको कुणाच्या । शेपटावरी पाय
आपुले काय जाय । द्या ठोकुनि ॥

आहे महत्वाचा । महसूल सरकारी
अशी बातमीदारी । करावी गा ॥

गुड बुकातच त्यांच्या । सदा सर्वकाळ रहावे
उगा न पहावे । उणे त्यांत ॥

वार्ताविश्वात विश्वास । नसू दे जरूरी
असू द्यावी मगरूरी । त्यांच्या आशीर्वादे ॥

ज्याच्या हाती ससा । पारधी असे तो
उगा का करितो । त्यांस प्रश्न?

कृपेने त्यांच्याच मिळती । जाहिराती सरकारी
तयानेच मिळे तरकारी । विसरू नये ॥

कुणी हिणवे का । ही नसे पत्रकारी
लक्ष न चकारी । द्यावे तिकडे ॥

अरे कसला आदर्श । खरी ती दुनियादारी
फिटविण्या उधारी । का येती इतर?

महाजनो येन जाता । याचि रे पथावरी
आपुली पथारी । कां वेगळी?

जयाची खावी पोळी । वाजवा तयाचीच टाळी
इतरांस देणे गाळी । चुकू नये ॥

आपुली बांधिलकी राहू दे । जो देई आपणास
अरे म्हणतात यास । कृतज्ञता ॥

कुणी म्हणे काहीबाही । कुणी चाटुकारिता
अरे खजिना जो रिता । त्याचे काय?

उगा नको नको आदर्श । अन सत्पंथाचे स्तोम
भरल्या खजिन्याने जोम । येत असे ॥

बदलेल कधी जरी । कुणाची ही सत्ता
बदलावी निष्ठा । क्षणार्धात ॥

जशी चाले हवा । त्याचा घ्यावा रे अंदाज
पत्रकारितेचा हा बाज । शिकोनी घ्यावा ॥

वापरावे आपुले ते । कौशल्य अंगीचे
उगा कुठल्या बंदीचे । न पडावे बळी ॥

मिका म्हणे जाणा । व्यवहार एकच सत्य
बाकी सगळे मिथ्य । असे जगी ॥

१४.

चर्चा ए चॅनेल

अफवा बातम्या । कर्णोपकर्णी सांगोवांगी
ही लेटेस्ट वानगी । आम्ही देऊ ॥

थोड्याच घटना । त्यात कल्पनेचे पाणी
मग सुटे आमुची वाणी । ऐकावीच ॥

कुठे घडे काही खुट्ट । त्याच्या हव्यात बातम्या
नको तारतम्या । उगाचिच ॥

करावा कधी कुणी कुठे । कावळा पराचा
बंद पाडावी वाचा । कुणाचीही ॥

भरवावे संगतीने । तिथे एक्स्पर्टांचे संमेलन
द्यावे आवतण । स्टुडिओत ॥

टीआर्पीसाठीच । चालवावे चॅनेल
बसवावे पॅनेल । चोवीस तास ॥

लावून द्याव्या मग । त्यांच्यातच कलागती
स्वत: स्वस्थ मती । पहावी गंमत ॥

असे आवाज आपुला । भला कर्कश मोठ्ठा
कुणी न म्हणेल खोट्टा । ओरडताच ॥

यास म्हणावे खुशाल । चॅनेलीय चर्चा
हाती हवा पर्चा । कशासाठी?

रेटावा उघड । आपुलाला अॅजेंडा
कुणी म्हणो गेंडा । कातडीचा ॥

चर्चेतून हाती न लागो । कुणाच्याच काही
पण टीआर्पी पाही । किती मोठ्ठा ॥

वार्ता रंजन कारी । हेच आपुले कर्म
चॅनेलचे हेचि मर्म । मिका म्हणे ॥

१५.

विश्ववृत्त.. नव्हे वृत्तविश्वाचा अभंग

वृत्तविश्वात घडली । असली घुसळण
उगा सत्याचे दळण । आऊटडेट ॥

अरे बातमी बातमी । कल्पनांची काय कमी
मग जुळवावी रमी । स्वविचारे ॥

हवा तो चालवावा । कुणाचा ही अॅजेंडा
कुणी म्हणो गेंडा । म्हणू द्यावे ॥

इंपा॑र्टंट ते फक्त । त्यांच्या गुडबुकात राहणे
उगा सत्यास लटकणे । कशापायी?

नव्या युगाचे ते सत्य । जे आपण सांगू
नव्हे आपणच सांगू । सुपरफास्ट ॥

थोड्या घटिताला द्यावी । कल्पिताची जोड
आपुल्याला बा गोड । मिळो फळ ॥

घ्यावे सत्य एक चिमूट । त्यास कल्पनेची फोडणी
चुरचुरीत ती जोडणी । करीत जावी ॥

कुणी म्हणा पसरवा । अधिकृतीने अफवा ते
कुणाच्या बापाचे काय जाते । सांगा बरे?

कुणी करील आरोप । म्हणे वृत्तास अफवा
त्यास विरोधकाचा कावा । हिणवावे ॥

येता अडचणीत । देशभक्तीचे पांघरूण
म्हणावे फेडितो ऋण । स्वदेशाचे ॥

असे महत्तेचे काय । सत्य की जाहिरात
जावे वृत्त ते प्रसारित । करत बिधांस ॥

जमवा रे टीआर्पी । जमवा सरकारी जाहिराती
पाची बोटे ती तुपाती । बुडवावी ॥

उगा कशास करावा । सत्य घटित अट्टाहास
बाकी करिती उपहास । सत्य जाण ॥

रहा सदा फास्ट । द्यावे ठोकुनि वार्तांकन
ऐकता ते जन । होती चकित ॥

असता कृपाशिर्वाद । तुजवर वरदहस्त
कशासी बा ग्रस्त । सत्यवचनी?

असावा पाठीशी हात । पाॅवरबाज त्या कुणाचा
मग का बरे वाचा । बसे सांगा?

मिका म्हणे व्हावे । राजाहूनीही राजनिष्ठ
मागे शुक्लकाष्ठ । लागू नये ॥

१६.

शक्तिमान

जगी सर्वशक्तिमान असा कोण आहे
न विचारी कुणा तू शोधूनी पाहे ।
एका आदेशे त्या जगा उलथावे
स्वस्वाक्षरी त्याने जगा पालथावे ॥

करू शके तो जगती अर्था अनर्थ
कुणी करता विरोधाची ही शर्थ ।
जोवरी बैसे सत्ता सिंहासनी तो
कवचकुंडले त्याची आसनी तो ॥

सत्तामेव जयते घोष ऐसा करी तो
स्व जयजय उद्घोष तोचि करीतो ।
फटकारे स्वाक्षरीने नव्हते होते असे रे
तयाची शक्ति बा तू समजोनी घे रे ॥

जगी ऐसा धुरंधर मणि कोण आहे
तोचि जया हाती सत्ता एकवटोन राहे ।
विचारो नये तो काय काय करी तो
अशक्यास शक्याचे सायास करीतो ॥

तोचि एक मग हा पुढे जात आहे
रहस्य तयाचे बा तू विचारोनि पाहे ॥
सत्तामेव जयते हे सत्य विसरो नये रे
हातपाय आपुले उगा पसरो नये रे ॥

शहाणपण न चाले कुणा सत्तेपुढे रे
नतमस्तक हो बा त्या मत्ते पुढे रे ।
जनां शहाणपणे असे जयाने केले
तयासी शांति सौभाग्य द्रव्य प्राप्त झाले ॥

सत्तामेव जयते हे विसरू नये रे
कोणी चिथाविले तरी घसरू नये रे ।
विरोधी कुणी हा असा माग काढी
तयांच्या पुढे बा हा असे हाल वाढी ॥

जया हाती लगाम सत्तारथाचे
तया लगाम का ते मनोरथाचे ।
सत्तेचिया सेवका कुणी वक्र पाहे
असा सर्व भूमंडळी पहा कोण आहे ॥

शक्तिउपासना हीच बलोपासना रे
सत्ता शक्ति मत्ता हीच वासना रे ।
सर्वशक्तिमानास उणे काय नोहे
नतमस्तक पुढती हा मिका होत आहे ॥

१७.

सदा सर्वदा..

सदा सर्वदा भोग सत्तेचा घडावा ।
न कधी ही विसर खुर्चीचा पडावा ॥

तिच्यासाठी करावे वाट्टेल ते ते ।
पहा संगतीने तिच्या काय येते ॥

खुर्ची संगतीने वैभव तेचि येते ।
खुर्ची जाता संगतीने घेऊनि जाते ॥

तरी सत्ता असली सोडू नये ती ।
सत्तेसंग सुबत्ता संगतीच जाती ॥

सत्तासंग सत्संग समजून घ्यावे ।
तयासाठी कुठेही कधीही नमावे ॥

सत्तेविण जगता अरे व्यर्थ आहे ।
खुर्चीविन कुणी न पुसुनि पाहे ॥

करी रे विचार या खुर्चीने काय केले ।
उगा ना उरीपोटी कित्येक ते गेले ॥

खुर्ची देतसे तुज ताकद सारी ।
तिच्यासवे पडसी तू सर्वांस भारी ॥

हिच्यासाठी रे लज्जा धरु नये रे ।
हिच्यासाठी रे यत्न सोडू नये रे ॥

जगी सत्ता जेथे नमति सारे तेथे ।
करावे तयासाठी लागेल ते ते ॥

इथे लोकशाही, पाया जनांच्या पडावे ।
इथे लोकशाही, भविष्य अपुले घडावे ॥

सत्तेविण वाचाळता व्यर्थ आहे ।
सत्तेनीच सारे सार्थ यथार्थ आहे ॥

हिच्यावीण कोणा तरणोपाय आहे ।
विचारी मना तूच शोधुनि पाहे ॥

सत्तासंगतीने बुडी खुर्ची येते ।
असामान्य तुजला बनवून जाते ॥

बहुगुणी बहुदुधी कामधेनू असे ती ।
तिच्यासाठी असू द्यावी सदाचीच प्रीती ॥

जना सत्ता ऐसी ती सोडू नये रे ।
जना भीति सत्तेची मोडू नये रे ॥

अरे खुर्चीचा उपयोग योग्य तोचि करावा ।
असे ती तोवरी उपभोग तिचा घडावा ॥

मिका म्हणे सदा योग हिचा घडावा ।
तयासाठीच यत्न सदा तो करावा ॥

१८.

दही हंडी

सत्तेची हंडी । खुर्चीचे दही
टेकू द्या सही । फोडु आम्ही ॥

सत्ता हीच शक्ती । सत्ता हीच भक्ती
तिज साठी युक्ती । योजाविच ॥

समजोनि हीस । तीच दही हंडी
एकेक शिडी । जावे रचित ॥

एकेकास ठेवावे । ऐसे ते प्रसन्न
तडजोडी प्रच्छन । नव्हे निषिद्ध ॥

सत्तेचीच हंडी । सत्तेचेच लोणी
अपवाद न कोणी । असे यात ॥

हीच असे मान । कृष्णाची शिकवण
सत्ता शिकरण । बनविशी ॥

म्हणा चाणक्यनीती । अथवा कृष्णनीती
असो अवनती । करी डोळा काणा ॥

बघता बघता । रचियली शिडी
पोहोचली हंडी । फोडा तीस ॥

ज्या हाती सत्ता । तोचि पारधी
विशेष न अवधि । लागे मग ॥

घडवू आम्ही । पक्षांतरे घाऊक
नका रे भावुक । व्हावे कोणी ॥

कशास असावी । मतमतांतरे
राखावी अंतरे । बहुतांचि ॥

दृष्टिक्षेपात नजीक । असता हंडी
कुणी का दांडी । मारावी ती ॥

गाठिले गाठीस । जवळी बहुमत
मग बहु मत । फोडा पक्ष ॥

या रे सारे यारे । तुम्ही समविचारी
त्यासाठी दिशा चारी । शोधू आम्ही ॥

सत्तेचे लोणी । नव्हे जणू गोंद
सर्वच नोंद । घेति तिची ॥

फोडुनिया पक्ष । उत्तम व्यवहारे
बिंदास विचारे । वेच करी ॥

या रे सारे यारे । द्यावा आम्हां टेकू
काही तुमचे ऐकू । आम्ही पण ॥

टेकू टेकू लावू । बनवू सुस्थिर सरकार
अन्यांची दरकार । कशासी बा?

पक्ष अपक्षास । मग केले ग्वाही
दवंडी दिशा दाही । पिटवावी ॥

कुणी म्हणे काही । कुणी काही बाही
मानू नाही काही । जनमता ॥

मतमतांचा गलबला । म्हणोनि ऐकावे
अन सोडून द्यावे । दुज्या काने ॥

नव्हे म्हणा कोणी । दोन वा तीन बस
कोंडाळ्याचे साहस । करिशी बा ॥

नीतीअनीतीस । न मन करा ग्वाही
चारी दिशा पाही । चाले हेच ॥

महाजन येन । जाती याच पंथा
तयाचिच संथा । घ्यावी तुम्ही ॥

लोकशाही म्हणा । बहुमताचा आदर
करावा सादर । सत्ता वग ॥

नाट्य हे बहुत । म्हणोनि जनहित
ऐसे हे आक्रित । घडो द्यावे ॥

मिका म्हणे साधणे । मोक्यास असले
नवनीत असले । लागे हाती ॥

१९.

फलकसम्राट!

इकडे तिकडे । सम्राटांचे राज
अन्य काही काज । न करे कोणी ॥

तो संघर्षसम्राट । तरूण तडफदार
करियरचे द्वार । उघडतसे ॥

कोणास अडेल । कोणास नडेल
न राहिल पडेल । फार दिन ॥

उठसूठ येताजाता । करूनि राडा
गल्लोगल्लीत दादा । म्हणवेल ॥

संघर्ष करील । फलक लावील
स्वत:स करील । बर्थडे विश ॥

होताहोता एक दिन । असा तो बनेल
कार्यसम्राट म्हणवेल । चोहिकडे ॥

मग कार्य सम्राट । मान करूनि ताठ
कार्यक्षेत्री गाठ । मारू लागे ॥

कार्य करू जाता । उत्साह ओसंडी
बसेल बोकांडी । त्या त्या विभागी ॥

करे काय काय । कुठे उपसे गटार
कुठे घाली टार । रस्तोरस्ती ॥

झाकण गटारावरी । फलक त्यावरी
म्हणे यापरी । नसे जनसेवा ॥

नसत्या नदीवर । हा बांधु शके पूल
म्हणे नदी गुल । झाली कैसी?

कार्यसम्राट बिरूद । मिरवे अभिमान
कार्याची जाण । ठेवावीच ॥

जागोजागी लागती । याचेच फलक
डोईवर तिलक । मिरवितो ॥

मिरवीता तिलक । वाटे व्हावे प्रमोशन
अशी इमोशन । कार्यकर्त्यांची ॥

पुढे पुढे जात । होई तो धर्मसम्राट
मग तयाचा थाट । काय वर्णावा ॥

असा धर्म सम्राट । असा तयाचा थाट
मांडितसे पाट । मध्यभागी ॥

धर्मसम्राटाचे । सारेच धार्मिक
हिशेब ही कार्मिक । धर्मासम ॥

एक धर्म त्याचा । दुजे असो कर्म
असेच त्याचे मर्म । जाणे तोचि ॥

कर्म धर्म होता । कर्मधर्म संयोग
नसे योगायोग । बने पुढे काही ॥

मग हृदयसम्राट । पुढिल पायरी
त्याचीच तयारी । करेचि तो ॥

रस्तोरस्ती गल्लोगल्ली । एकचि नाम
हृदयसम्राटाचे काम । कैसे असे ॥

सिंहासनावरूनी सम्राट । कधी म्हणे घडवा दंगा
कधी घ्या म्हणे पंगा । एकेकाशी ॥

एकाच हाकेत । येती धावून सगळे
कुणाकुणा वगळे । हा सम्राट ॥

हृदयसम्राट तो । याची अलगचि शान
सारे याचेचि गान । गात असती ॥

हा होई मोठा मोठा । मागे पाही वळून
नजरेतून न गळून । जात काही ॥

बनणे एकातुनि एक । दुसरा सम्राट
असा करियरी घाट । घातलासे ॥

होतकरू कुणी । लावी हृदयसम्राटाचे फलक
संघर्षसम्राटाचा जनक । हाच असे ॥

कित्येक प्रकारचे । बनती सम्राट
होर्डिंग सम्राट । बनावे झडकरी ॥

असे असो आपुले । असे कामकाज
असो फलकराज । गल्लोगल्ली

बनविले मोठे । धन्यवाद ते होर्डिंगां
दाखवीन म्हणे इंगा । अन्यांसी ॥

उभारावे उंचउंच । नको कंजुसी कशात
अशानेच अशात । ये समृद्धी ॥

रस्ते गल्ली बोळ । बनती याचसाठी
उगा कायद्यापाठी । लागू नये ॥

फलक रस्तोरस्ती । लावा रे लावा रे
फळं चाखा रे चाखा रे । बेकायदा बेहत्तर ॥

कायदा बेहत्तर । बसवा धाब्यावर
महापालिकेवर । विसंबावे ॥

तिकडले ते ढुढ्ढाचार्य । यातुनचि निपजले
एक एक उगवले । नेतागण ॥

होर्डिंगाचे देणे हे । होर्डिंगकारण
तयातुनि राजकारण । घडवावे ॥

बनूनि फलकसम्राट । लावावा नेट
जन हृदयी थेट । बसून जावे ॥

मिका म्हणे फलकांसी । करावे वंदन
समाज घडण । घडविती हेचि ॥

२०.

करियर

नव्हे शिक्षण शिक्षण । राजकारण उत्तम
नाही काही या सम । अन्य दुजे ॥

नसे या परीस । अन्य करियर काही
यास तोड नाही । समजावे ॥

येथे न लागे । काही पात्रता शिक्षण
सत्तेचे शिक्रण । मिळवावे ॥

उगा का व्यर्थ । काळ शिकण्यात
शाळा काॅलेजात । पुस्तकी विद्या ॥

शिकून सवरून । काय घेशी उखडून
राहशील का तरूण । लागोन मागे ॥

प्रत्यक्ष आखाड्यात । घ्यावे ते शिक्षण
करावे निरीक्षण । बारकाईने ॥

उठावे पडावे । राजकारणात थेट
कार्यकारणात ऐट । दाखवावी ॥

करियरची आपुल्या । करावी सुरूवात
दहीहंडी गणपतीत । उत्साहाने ॥

मिरवावे असे । बनूनी कार्यकर्ता
अन पावत्या फाडता । जमवी वट ॥

रस्त्यावर फलकावरी । नाव झळकावे
प्रसिद्ध पावावे । लवकरीच ॥

अरे होर्डिंग होर्डिंग । त्यातूनच होई नाव
सापडेल मग वाव । त्यातूनचि ॥

फिरावे बिनधास्त । करीत टगेगिरी
कधीमधी हाती सुरी । बाळगावी ॥

अडल्यानाडल्यासी । कधी करावी मदत
जराशी गंमत । उपयोगी ॥

करो जावे असंख्य । खट लटपटी
द्यावे कानफटी । कुणा दुष्टा ॥

आपुल्या कर्तुते । व्हावे ऐसे खट
म्हणजे ऐसी वट । जमतेचि ॥

ऐसी पुण्याई बहुत । बांधुनिया गाठी
इतरांस पाठी । सोडूनि द्यावे ॥

ऐसे जावे करीत । वाढवीत वट
मग करावी वटवट । बिनधास्त ॥

येनकेन प्रकारेण । मिळवावे तिकिट
घालावे जाकिट । नेत्यासम ॥

वाॅर्डावाॅर्डातुन । होई असला प्रसिद्ध
मग होई सिद्ध । नगरसेवक ॥

रहावे मर्जीत । कुण्या वरिष्ठाच्या
किंवा कनिष्ठाच्या । पडावे पाया ॥

उगा ताठ कणा । वृथा स्वाभिमान
वा लांगुलचालन । नसो तत्वांचे ॥

अरे शिकावी लाचारी । आणिक गद्दारी
हीच कलाकारी । नेई पुढे ॥

राजकारण नव्हे । हे इच्छाकारण
असावे कारण । उत्कर्षाचे ॥

करावी सुरूवात । सायकली दुचाकी
मर्सिडीसी चारचाकी । नसे दूर ॥

फिरावे दारोदारी । नगर्सेवक आमदारी
मंत्रीपद खासदारी । येती मागे ॥

एकचि क्षेत्र । न शिक्षण सक्तीचे
फक्त उक्तीचे । असे काम ॥

मिका म्हणे ऐक । आणिक रे शिक
नच तर भीक । मागशील ॥

२१.

द्वेषोद्वेषी!

द्वेषा द्वेषावर फुलू द्या राजकारणाची नीती ।
फोडा आणिक झोडा ही सत्तेची असे रीती ॥

या जगती देवे न निर्मियेला एकासम दुसरा ।
एक दुसऱ्यास म्हणे, तू तर भलताचि तिसरा ॥

द्वेष द्वेषाने चेतवावा, अशी भडकवावी आग ।
एकेकास दुसऱ्याचा येत राही मनी राग ॥

यांचे वेगवेगळे धर्म जात भाषा वर्ण प्रांत ।
अरे फरक इतुके कशास ती पडावी भ्रांत ॥

एक दुसऱ्यास म्हणा, तू तर श्रेष्ठ याच्याहूनी ।
काय ऐकशी त्याचे तू.. दे त्यास एक ठेऊनी ॥

अशी फुलवावी अस्मिता, वारंवार फुंकरीनं ।
मग भडकवी भावना, न जाव्या त्या विझून ॥

एकाने मग दुसऱ्याची पकडावी मानगूट ।
लगे रहो म्हणा मग, कसली होई एकजूट ॥

अस्मिता भावनांच्या तव्यावर त्या तापल्या ।
भाजाव्या पोळ्या बिनधास्त, मारे मारीत टपल्या॥

अस्मिता नि भावना यांचे संमोहन आगळे ।
भेटवावे भिडवावे घडवावे मीलन वेगळे ॥

जन तसे असती प्रवाही, जाती सहजी वाहवुन ।
वाहवणाऱ्या त्या कुणास वळवणे ना कठीण ॥

एक एक घ्यावा मुद्दा नि द्यावे त्यास पेटवून ।
न विझू द्यावा वन्ही, ठेवा त्यास चेतवून ॥

धन्य असे अपुला देश, यात इतकी विविधता ।
ध्यानीमनी फरक एकेक, वर्षावर्षांची ना चिंता ॥

एक दुसऱ्यास फितवावे, बसवावे उरावर ।
त्यांच्या अस्मिता भावनांना न राहो पारावार ॥

अशी बनवावी नीती, तीस म्हणा रणनीती ।
न मावळेल सूर्य कधी, कशास कुणा भीती ॥

जन संमोहित होता, त्यांवरी न विवेक अंकुश ।
उभारावे साम्राज्य अन राज्य करावे निरंकुश ॥

एकेकास एकीचे द्यावे महत्व पटवून ।
त्या आडूनि पसरे बेकी, न द्यावे जाणवून ॥

म्हणा एक देश एक भाषा एक प्रांत एक सारे ।
वाहू द्या गावोगावी सर्वत्र एका एकीचेच वारे ॥

एकसंध तो समाज ऐसा देता करून समज ।
मते पडती मतपेटीत, उगवे सत्ता ती सहज ॥

द्वेष शिकवावा जाणवावा, द्वेष सदा जागवावा ।
द्वेष पेरावा उगवावा, द्वेष संगोपने वाढवावा ॥

अशी त्या द्वेषाची महती, सर्वदूर सर्व गाती ।
द्वेष मत्सर ईर्षा संघटूनी, गावी द्वेषाचीच ख्याती॥

मिका म्हणे द्वेष करा, द्वेष पसरवावा सर्वदूर ।
अशी प्रगती द्वेषाची, तोच आणिल सत्ता-पूर ॥

२२.

बोलाचिच कढी

बोलाचिच कढी ओरपावी कवतिके ।
तयातचि सत्व मिळत असे निके ॥

बोलाचाचि भात खावा अन सुखे ।
व्हावे तृप्त बोलू नये रहावे असे मुके ॥

थाळी पंचपक्वानी, घ्या कढी घ्यावा भात ।
सुरस सात्विक पौष्टिक, याची अलगचि बात ॥

मिळे खावयास, भाग्यवान असा तुम्ही ।
असे बोलाचिच का न, न काही तुम्हा कमी ॥

ओरपावी कढी घोटघोट, घ्या भाताचाही घास ।
महनीयांनी आणिला हो, घ्या हा खासमखास ॥

का न भरे तुमचे आश्वासनांनी हो पोट ।
का न समजे लाविले तुम्हां मधाचेच बोट ॥

समजुनि घालावे पाठीशी, व्हावे विशाल उदर ।
निवडणुकी आश्वासनांचे समजूनी घ्यावे ते पदर ॥

त्यांचीही ही न चूक, नसे त्यांचा ही इलाज ।
आश्वासनांविणा कसे व्हावे खुर्चीवरती विराज ॥

प्रियकर आणे म्हणेल तोडुनिया चंद्र आणि तारे ।
तसे व्हावे यांचे काही वाहता निवडणूक वारे ॥

घालावी तोंडातही बोटे, ऐकुनि म्हणावे वा! वा रे!
करमणुकीचा जाहीरनामा, त्यावरी विसंबशी का रे ॥

असा हंगाम हा असला, वाहे इकडून तिकडे वारे ।
तू न अडाणी निरागस बावळट, विश्वासतो मारे ॥

अरे विश्वासानेच होई, समज भंग विश्वासाचा ।
चूक तुझीच तुझीच, तयांना मानशी का साचा ॥

जगाच्या कल्याणा असती विभूती तयांची ।
न निवडूनी येता, न सत्ता, असे काय कामाची ॥

जनकल्याणास भुलविणे, क्रमप्राप्त हा जुमला ।
बोलावे आश्वासावे, बांधावा स्वप्नांचा इमला ॥

त्यांना काळजी तुझी अन चिंता समाज समष्टी ।
पाहुनिया वंचित दरिद्री ते होत असे कष्टी ॥

दर पंचवर्षी चिंता, दर पंचवर्षी तयांस काळजी ।
खैरात आश्वासनी, पंचवर्षी जनतेची हाजी हाजी ॥

कल्पित सुरस चमत्कारिक, जाहीर जाहीरनामा ।
कुणी म्हणती वचन, भुलविती काही नामा ॥

मग लागती रांगा, हेचि हो नेता हो आमुचे ।
हे देतील ते ते, ते दुजे न काही कामाचे ॥

राजा एक दिवसाचा होई खुश देऊनिया मत ।
टाइट काॅलर, पिळे मिशा, समजुनी आपली पत ॥

यथावकाशी होई रंक, राजा चढे सिंहासनी ।
जाहीर वचनांचा नामा, ठेवे गुंडाळुनि तो बासनी ॥

येई संमोहनातुनी बाहेरी, समजुनी पायरी ।
राजवाड्यात राही राजा, याची जागा तर बाहेरी ॥

पंचवर्षी पोटभरे मग खाई बोलाचिच भात कढी ।
मन विशाल असे याचे न ठेवी मनामधी अढी ॥

मग तो होत असे परत तयार पंचवर्षीय पुढील ।
त्यास ठाऊक तो प्रजा, रहावे सोशिक सुशील ॥

मिका म्हणे हीच असे, ह्यास म्हणती लोकशाही ।
तो एक दिवसाचा राजा, मग उडे बोटावरली शाई ॥

२३.

नेता

पहिले ते कारण । मग सत्कारण
हवे राज-का-रण । ठिकाणी सर्व ॥

जळी स्थळी सर्व । काष्ठी अन पाषाणी
मारोनि लाथा पाणी । काढे नेता ॥

अहमिहमिकेने । ओढित कुणाचे पाय
सर्वांपुढे जाय । तोचि नेता ॥

म्हणावे त्यास जरी । तो मागे नेता
त्या मागुती जाता । जनसकल ॥

विषयाची जाणीव । करोनिया देई
त्यास अॅजेंडा नाही । म्हणू कोणी ॥

फिरवेल टोपी । हवा वाहे तैसी
महती त्याची ऐसी । ऐकावी गा ॥

म्हणू नये कुणी । अगं अगं म्हशी
कुठे मला नेशी । अजिबात ॥

उद्धारे तोचि एक । त्यावाचूनि गती कशी
टीकाकारांच्या फशी । पडो नये ॥

घेऊन तो जाई । म्हणे करण्या प्रगती
जे होई त्या दूर्गती । समजो नये ॥

चला मागुती तयाच्या । तोच प्रगतीचा पथ
कुणी न आडवी रथ । तयाचा रे ॥

कोणी न म्हणावे त्यास । आपुली फरफट
नाही फोलपट । तयाची वचने ॥

निवडावे तयास । येता इलेक्शन
करावे सिलेक्शन । तयाचेच ॥

त्यावाचून नसे । कुणा तरणोपाय
दुसरा उपाय । नसे काही ॥

तोचि एक त्राता । तोचि एक नेता
तोचि एक जेता । सदासर्वथा ॥

तोच मारीतसे । तोचि तारीतसे सर्वा
वाहाव्या त्या दुर्वा । भगवान तो ॥

वाहाव्या त्यास निष्ठा । न मनी धरी शंका
वाजवावा डंका । मिका म्हणे ॥

२४.

निष्ठावंत

जो बसे सदा पायी । असे असती अनुयायी
तोचि खरा रे जाणावा । नेता तोचि ओळखावा ॥

नेता तोचि एक । ज्यामागुती अनुयायी
हा मर्सिडिसी तो पायी । चालितसे ॥

अनुयायास हवा रे । ऐसा भक्तिभाव
विचारी अभाव । हवाच त्यांसि ॥

नेता म्हणे तो शब्द । पडो देऊ नये खाली
शिवीस ही ओवी । समजावी ॥

आज्ञा होत त्याची । उचलावी सतरंजी
उगा भविष्यास रूंजी । घालो नये ॥

उठा म्हणता उठे । बसा म्हणता बैसे
अनुयायी ऐसे । हवेत गा ॥

फेकित दगड त्याच्या । एका इशाऱ्याने
कुणाच्या ताशेऱ्याने । न घाबरे तो ॥

नेत्यासाठी आपुल्या । कुणा शिंगावरी घेई
ठोसा दोनेक देई । नाकावरी ॥

करे हांजी हांजी । अस्सल निष्ठावंत
असला जातिवंत । असे तो गा ॥

धन्यासाठी घेई जीव । जाई कारागृही
नसे कशाचा आग्रही । निष्ठावान ॥

अशा वाहतो निष्ठा । आपुल्या धन्या पायी
काही अन्य उपायी । नसे त्यास ॥

नेत्याच्या चरणी । असे सदा लीन
गुणगानी तल्लीन । धन्याच्याचि ॥

न जाई तो सोडून । न द्यावी त्या लालूच
न घेई तो लाच । असला धन्य ॥

साहेबाची उचलावी । रोज बिनधास तळी
कुणा इतराच्या गळी । फसे ना तो ॥

मिका म्हणे ही तर । असे दुर्मिळ प्रजात
न सापडे शोधू जात । देशांतरी ॥

२५.

पक्षांतरातुर!

पक्ष विपक्षास । मन केले ग्वाही
मानू नये काही । जनमता ॥

निवडून येता । एकदा तो म्हणे
मी मुक्त पणे । बदलेन पक्ष ॥

निवडून आलेल्याचे । असे आपुलाले मत
त्याने अपुली पत । सांभाळावी ॥

जावे तिकडेचि । जिकडे जादा मोबदला
तिकडे हो बदला । पक्ष आपुला ॥

ह्यासच म्हणती । खरी लोकशाही
उगा काही बाही । बकू नये ॥

नका चढवू कुणी । लोकांस डोईवरी
निवडलेला भूवरी । नसतोचि ॥

त्यास असति ते । विशेषाधिकार
त्याचा कुणी धि:क्कार । करो नये ॥

दारी येई लक्ष्मी । कुणी देई सत्ता
कुणी देई मत्ता । न नाकारावी ॥

बदला दल वा रंग । रंग असो करडा
कुणी म्हणे तो सरडा । म्हणो द्यावे ॥

यास का व कसे । कुणी म्हणे पक्षांतर
कुणी जनमताचा अनादर । का म्हणावे?

लक्षुमीची पाऊले । पडतात दारी
त्यास अनुदारी । संस्कृतीहीन ॥

आम्हीच इकडले । खरे संस्कृतीरक्षक
अन्य ते भक्षक । समजावे ॥

सत्तेविन नाही । संभवत बदल
म्हणूनि अदलबदल । घडवावाचि ॥

आपुल्या कल्याणात । असे कल्याण जनांचे
ऐसे ऐकावे मनाचे । बिनधास्त ॥

उगा मग आम्हा । हिणवती कुणी
पण मिळणारे लोणी । विसरू नये ॥

इतका रे संवेदनशील । न बनावे ते मना
करावे मनाचेचि । सांगितले संतानी ॥

हवी तर मागवा । गेंड्याची कातडी
लोळवा चामडी । विरोधकाची ॥

जनमताचा अनादर । यास न म्हणावे कुणी
तेचि आपुले ऋणी । असतीच ॥

आपणच असता ना । जनांचे प्रतिनिधी
मग मिळता निधी । नकार कैसा?

जनांस न कळे । काही भले अथवा बुरे
लाड तयांचे पुरे । इलेक्शनी ॥

शासन चालवणे । असे जबाबदारी आपुलीच
पक्षांतरे तीच । निभावावी ॥

मिका म्हणे ऐशा नरा । मोजून घालाव्या नमस्कारा
लोकशाहीचा रे चमत्कारा । ऐसा असे ॥

२६.

माझिया मंत्रीपदाचे गायन

श्रेष्ठींच्या कृपेने । मिळाला प्रसाद
मंत्रिपदाचा प्रासाद । मिळेलचि ॥

इथल्या शासनी । मंत्री बनोनि आम्ही
जनतेच्या कामी । पडो ऐसे ॥

सदासर्वदा नजरेत । भलेच जनतेचे
मंत्रिपद रयतेचे । सांगा ऐसे ॥

बसता खुर्चीवरी सत्वर । म्हणा भरेन अनुशेष
हेच पदाचे विशेष । सांगा ऐसे ॥

नावाचा आमदार । त्याचा नुसता वावर
हाती नसता पाॅवर । काय करे?

जनसेवेची ही आस । त्यासाठी कासावीस
त्यासाठीच घासाघीस । करो आम्ही ॥

होऊ मंत्री खास । नाही कुणी ऐसा येरू
लफ्फेदार सही मारू । शासनादेशी ॥

मंत्रीपदास हा प्रिय । एका लेखणीचा फटकारा
त्याचा का रे तिटकारा । अलोकशाही ॥

आमदारा मनी ऊर्मी । जनसेवेची अनिवार
ऐसा करू कारभार । मंत्रालयी ॥

बदलण्या राज्य । झालो म्हणा आम्ही मंत्री
द्यावी ऐसी जंत्री । अखंडित ॥

जनांच्या कल्याणा । मंत्र्यांच्या विभूती
सांगत खुंटी । बळकटावी ॥

मिळे जनादेश । त्याचा ठेवित मान
कुणी माना वा न मान । त्याचे काय?

हवी बसण्या फक्त । एकच खुर्ची ही
अन्य मागणे काही ही । नसे म्हणा ॥

तल्लीन भजनी । करा खुर्चीचे गायन
मग होई पलायन । विरोधकाचे ॥

ऐशा या खुर्चीचे । मिका गायन करीत
सत्तेचे भरीत । बनो ढंगदार ॥

२७.

सांभाळ खुर्ची सांभाळ..

जनप्रतिनिधी म्हणूनि । आला निवडून
श्रेष्ठिंनी पारखून । केले मंत्री ॥

त्या पदाची असे । अलगच शान
परंतु भान । बाळगावे ॥

न समजावे अंतिम । नाटलावे चोहिकडे
ठेवा नजर तिकडे । घारीसम ॥

करावा खुर्चीचा । सांभाळ जिवापाड
कुणी सत्तेआड । येऊ नये ॥

न तोडू द्यावा । कुणा खुर्चीचा पाय
हवे ते उपाय । करा सत्वरी ॥

कृपाप्रसादे लाभे । लाल दिवा गाडी
त्यास कुणी काडी । लावो नये ॥

अति काळजी घ्यावी । लागे नामदारा
होऊ नये ते उदारा । खुर्चीवरी ॥

आपुलीच सावली । न साथ देई कधी कधी
म्हणोनि मधीमधी । व्हावे सावधान ॥

एका खुर्चीस ह्या जाणा । विरोधक असती बहु
कधी स्वपक्षी ही हुबहू । शक्य असती ॥

न ठेवावा कधीच । कुणावरी ही विश्वास
फक्त आपुलाच श्वास । आपुला असे ॥

युद्धाचा प्रसंग । असा रातदिन
कुणावरी न विसंबुन । रहावे गा ॥

मिका म्हणे ऐका जरा । अखंड असावे सावधान
ठेवावे ते व्यवधान । खुर्चीलागी ॥

२८.

बनलो मंत्री.. पुढे काय?

बहुधा पूर्वजन्मी । बहुत सुकृताची जोडी
तेधवा लाल दिवागाडी । मिळतसे ॥

ही संधी दुर्मिळ । आणिक असे अपूर्व
मग यत्न करावे ते सर्व । चिकटण्याचे ॥

असो कितवीही खेप । लावो कुणी कुठली टेप
कुणी म्हणे ही गूळ ढेप । चिकटावे मुंगळ्यासम ॥

हसती तयांचे दिसतात । मोजावे ते तयांचे दात
वा घालावे थेट ते घशात । जादा वटवटी ॥

जोडोनिया खुर्ची । उत्तम प्रकारे
उदास विचारे । वापरावी ॥

कुणी म्हणे का व्हावे । नामदारास ते उदास
म्हणावे खुर्चीदास । असतो मी ॥

सत्तेत न रमे जीव । बोलत जावे कधीमधी
मग साधत संधी । जावे पुढे ॥

स्वामी व्हावे खुर्चीचे । म्हणावे उपभोगशून्य
कुणी उपयोगशून्य । भले म्हणो ॥

मना माझिया रे बनावे । ऐसा रे तू दगड
मग संधी रे रगड । राजकारण्या ॥

कमवावे जाड चर्म । करावे ते मंत्री कर्म
वाढवावा तो मंत्री धर्म । दिसामासी ॥

तात्पर्य ते एकच । ऐशा मग मंत्रीगणास
नाही संधींची पत्रास । मिका म्हणे ॥

२९.

सत्तासोपान

ईशकृपा होई । पुत्र होई ऐसा गुंडा
गल्लोगल्ली गाडे झेंडा । दादागिरीचा ॥

कुणी म्हणे दादा । कुणी म्हणे भाई
मेहनत वाया न जाई । त्याची कधीच ॥

काय तयाची महती । असे भलताच धीट
असे त्याचीच वट । गल्लोगल्ली ॥

एके दिन परंतु । कळते तयाते
आला तो वयाते । अचानक ॥

म्हणे जाणे पुढे । असेच जरूरीचे
स्वरूप मगरूरीचे । बदलावे ॥

वट त्याची इतुकी । त्याच्या इच्छा अनेक
व्हावे नगरसेवक । मित्र म्हणती ॥

नगरसेवकाची कशी । आॅफिशियल वट
कायद्याची कटकट । नसे मागे ॥

सुरू होतो इथे । चढणे सत्तेचा दादर
पाॅवरचा आदर । दिसू लागे ॥

आता म्हणे तो न । पाहणे वळोनिया मागे
सत्तेचेच धागे । विणावे घट्ट ॥

नगरसेवकाचा । मग बने आमदार
भलताच नामदार । बने गुंडा ॥

नेहमीच वॉटेड । होता पोलिसांस ज्या
ते वाकति पुढे त्या । नम्रतेने ॥

मग आमदाराचा व्हावा । कुणी तरी मंत्री
ही सत्तेची जंत्री । निरंतर ॥

कधी राज्यमंत्री । कधी कॅबिनेट
लावूनिया नेट । बनतो हा ॥

करावे राजकारण । खेळावे राजकारण
जगावे राजकारण । यासाठीच ॥

आता खुणावते त्यास । दिल्ली नसे दूर
सत्ताकांक्षेस पूर । का न यावा?

चढता आलेख । चढावे सत्ताशिडीवर
सत्ता दरबारी वावर । असो सदा ॥

मिका म्हणे चढावी । अशी सत्ताशिडीची पायरी
पैशास पायली । असति जनसामान्य ॥

३०

सापशिडी

सत्ताशिडी नव्हे हा तर । सापशिडी खेळ
कधी बिघडेल मेळ । भरवसा नाही ॥

आमुचा हा गुंडा । चढे वर वर
लक्ष त्याच्यावर । इतरांचे ॥

दिल्लीश्वर म्हणती । हा उंच कसा इतुका
त्याचे पर जितुका । तितकाचि हवा ॥

ठरवून मग कापा । पंख त्याचे थोडे
अडवा त्याचे घोडे । रस्त्यातचि ॥

असे हा एक । तर तेथे सव्वाई गुंडे
चीत चारी मुंडे । करतील ॥

गुंडा मग जाई । सापाच्याच मुखी
श्रेष्ठींच्या लेखी । किंमतहीन ॥

लवलो आजवर । कमरेत इतुके
त्याची कवतिके । संपली का?

कळण्या काहीआधी । बुडाखालूनी खुर्ची जाई
काय करू काही । कळेनाचि

होत्याचे नव्हते । कसे होई ते क्षणात
आले ना ध्यानात । कळेनाचि

म्हणे हे सारे कसे । झाले काय आता
कशा मारू बाता । जनतेशी ॥

मिका म्हणे हा तर । सापशिडी खेळ
सर्पामुखी कधी । न सापडावे ॥

३१.

खुर्ची

हिच्या साठी पडो । कुणी हातापायी
कुणी हिच्या पायी । टाकावा जीव ॥

हिची काय वर्णावी । अशी असे महती
हिच्या विना ना गती । राजकारण्या ॥

बसूनी हिच्यावरी । मारलेला शिक्का
जणू हुकुमाचा एक्का । समजावा ॥

करावी अशी ती । सही लफ्फेदार
होऊनि उदार । तिजोरीवरी ॥

शासन आदेश । म्हणावे त्यास
अर्थ तासन तास । लावावा ॥

हिच्यापुढे नाही । कुणीच शहाणे
न चालती बहाणे । कुणाचेच ॥

समजावा हिचा । असला महिमा
यासाठीच मोहिमा । आखाव्यात ॥

काय सांगावी या । खुर्चीची ही जादू
विरोधकां गाडू । हिच्या संगे ॥

खुर्चावाचूनी न कुणाचा । होई सत्तासंचार
हिच्याविन असार । सारे काही ॥

ही आहे तर असती । सलाम चोहिकडे
तिच्या पलिकडे । आहे काय?

हिच्यावाचूनिया सुने । जग भासे सारे
बदलाचे वारे । न सोसवती ॥

असू द्यावी स्थिर ही । अशी चारी पायी
तरूनिया जाई । सत्तासागरा ॥

द्यावी खुर्ची स्थिर । नको देऊ डगमग
उगा का तगमग । व्हावी जिवाची ॥

उगा न बने कोणी । ह्या खुर्चीचे गुलाम
उगवत्या सूर्यास सलाम । करीती सारे ॥

मिका म्हणे ऐसे कैसे । जगावे खुर्चीविन
कैसे तगावे खुर्चीविन । राजकारणी ॥

३२.

विकास गंगा

उठा उठा सकळीक । आली विकासाची गंगा
त्यासाठी नको दंगा । आली दारी ॥

पहा उघडून डोळे । उभा राहे नवा पूल
रस्ता पांघरतो झूल । नवी कोरी ॥

त्यासाठी बलिदान । भले झोपड्या वृक्ष झाडे
अरे नको कुणाचे पाडे । मधीमधी ॥

जावोत गाड्या भरधाव । झिप झॅम झूम
अहो विकासाची ही टूम । नवी नाही ॥

पाडा रे बिनधास्त । कुणी येतात आडवे
प्रतिगामी ते कडवे । निर्दालावे ॥

तरी वृक्षवल्ली असती । म्हणा आम्हास सोयरे
सकल सहचरे । असती ते ॥

त्यासाठी साजरा एकु । पर्यावरणाचा दिनु
तोंडपुजेचे ते भानु । बाळगावेचि ॥

मग करावे झोकात । उद्घाटन ते पुलाचे
म्हणा भाग्य ते मुलांचे । उजळेचि ॥

अरे विकास विकास । करा मतांची बेगमी
जन काय मग कमी । पडू देती?

मिका म्हणे रे आली । विकासाची गंगा दारी
वाटोनिया अरे भारी । करा साजरे ॥

३३.

जनाचे श्लोक

सत्ताधीश तो ईश सर्वां जणांचा ।
समुच्चय समजा तो सर्व गुणांचा ॥

नमू चारदा यास, बसेल वाचा ।
धरा पंथ याचाचि सत्ताधीशाचा ॥

अरे सज्जना याच पंथेचि जावे ।
तरी तो कसा पाविजे तो बघावे ॥

जनी विरोधी ते सर्व सोडूनि द्यावे ।
वदे तोचि ते सर्व मानित जावे ॥

अरे विरोध यास कामा न ये रे ।
याच्या हो स हो मिळवीत जा रे ॥

अरे गाढवा ही नीती सोडू नको हो ।
मग गुड बुकांत त्याच्या तूच राहो ॥

नको रे जना शाणपट्टी ती दुधारी ।
वंदावे सदा त्यास जो सत्ताधारी ॥

तयाचे स्तुतिसत्र ते अंगीकारू ।
नपेक्षा अवस्था रे होई जरत्कारू ॥

नको रे करू तू टीका कशाची ।
करि विचार, अवस्था ती हो फुकाची ॥

उगा त्यास का प्रश्न विचारू नये ते ।
त्याने शाणपण रे असे का न ये ते ॥

उठावे अन ते स्तुतीस्तोत्र गावे ।
न मरावे अन कीर्तीरूपी उरावे ॥

पुरस्काराचा रे करशी विचार ।
गाठीशी बांधून घ्यावे दोन चार ॥

जना प्रसिद्धी असली सोडू नको हो ।
मिका म्हणे विचार हाच मनी राहो ॥

३४.

असत्यमेव जयते.

(अर्थात टीव्ही चॅनेल्सची बातमीदारी)

इये लोकशाहीच्या नगरी । स्तंभ चवथा राज्य करी
आप आपलुल्या तो परी । सदा एव ॥

नको बातमीस काही आधार । तुम्हाविण हे निराधार
बातमीरंजनास साकार । करित जावे ॥

मनोरंजक असावे वार्तांकन । असे करावे रेखाटन
जणू वार्ताविश्वाचे पर्यटन । घडवावे ॥

बातमीविश्व ते गाजवावे । नटनट्यांसी लाजवावे
करमणुकामृत जनी पाजवावे । दिसामाजी ॥

बनावे बा वार्ता व्यापारी । दिनरातीस अन दुपारी
राज्य रंजनविश्वावरी । करीत रहावे ॥

कल्पनेस त्या ताणावे । अन्य कशास न मानावे
सत्य असत्यास न करावे । मन ग्वाही ॥

सत्या जाऊ दे मरणालागोनि । मूल्य बातमीस विसरोनि
ऐसे द्यावे ते ठोकोनि । बिनधास्त ॥

वृत्तास असावे मूल्य रंजन । पत्रकारितेचे करोनि भंजन
उगा न घालावे अंजन । कुणाचिया डोळा ॥

न माना अफवा असत्यासी । नको दुराग्रह सत्यासी
मानावे आपुल्याचि पत्त्यासी । खेळावे ऐसे ॥

पसरवावी ती सनसनाटी । वाढावी बातमियांच्या ताटी
आपुल्या टीआर्पी साठी । रहावे झटत ॥

न घडता काही ती घडवावी । बातमीत गावे बुडवावी
पत्रकारिता घडवावी । अखंडित ॥

कुठे लावावी अशी आग । रिपोर्ट करावी भागमभाग
प्रेक्षकांस आणावी जाग । ऐसे करावे ॥

निवडावे शहर अथवा खेडे । तिथे घडवावे तंटे बखेडे
बातमियांचे घालोनि वेढे । कमवावे ॥

न घडले असो कुठे काही । कोण कशास ते ढुंकून पाही
पसरवाव्या दिशा सहाही । असल्या वार्ता ॥

कुणासी न द्यावे लागे जवाब । बनावे करमणुकीचे नवाब
प्रश्न कर्ता कुणी कबाब । मधला हड्डी ॥

वृत्तवार्तांकन असे सार्वभौम । येऊ द्यावा तयाने जोम
उगा सत्यासत्याचे स्तोम । माजवू नये ॥

इये बनावे बातमीविके । नको बा काही सत्व निके
द्यावे जे जे जाई विके । झटपट ॥

मिका म्हणे ऐशा बातमीदारा । समजावे मनरंजनाचा पसारा
सत्यमेव जयतेचा घसारा । द्यावा होऊ ॥

३५.

इये राजकारणाचिये नगरी..

इये राज्यकारणाचिये नगरी । एकमेक द्वेष करी
आपण ते परोपरी । करावे यत्न ॥

मनी नसावा काही क्लेश । पसरवावा ऐसा द्वेष
असो द्यावा ऐसा त्वेष । सत्ताकारणे ॥

ऐसे करावे काही कामी । वाटून द्यावे तुम्ही न आम्ही
मग मतांची बेगमी । सुनिश्चित ॥

शोधाव्या ऐशा दुमती । मग लावून द्याव्या कलागती
त्याविना नाही गती । समजावे ॥

गुण्यागोविंदे राहता समाज । तो न कामाचा समज
त्यास न आपली गरज । समजोनि जावे ॥

ऐसे समाजास चेतवावे । अस्मितांस ते पेटवावे
एकमेकांसी भिडवावे । राहोनी मागे ॥

समाज तो दुभंगावा । मग तो वाटूनी घ्यावा
ऐसा समाजरक्षणाचा पावा । वाजवित जावे ॥

एकेकास ते फोडावे । कुणा अन्यास झोडावे
मग ऐसे राज्य करावे । सुखनैव ॥

ऐसे विभागावे जनांस । आपण आणि तयांस
समाजस्वास्थ्याची पत्रास । बाळगो नये ॥

खुशाल माजो दुही दुफळी । तीच होई बा सुफळी
मग फोडावा श्रीफळी । सत्तास्थानी ॥

उद्दिष्ट ते न समाजकारण । एकच लक्ष सत्ताकारण
त्यासाठीच ते राजकारण । करीत जावे ॥

समाजास ते पटवावे । ढोल स्वत:चेच बडवावे
विरोधी कुणास ते बुडवावे । अखंडित ॥

इये निवडणुकीच्या प्रहरू । ऐसा उसळावावा जनसागरू
मग भरोनि घ्यावी घागरू । मताधिक्याची ॥

ऐशा राजकारणास न मरण । फुगविती टम्म भरून सारण
सत्तेची करंजी जाण । मटकवावी ॥

यास सत्ता व्रत समजावे । मनोभावे तेचि करावे
फळ त्यास खुर्चीरूपी मिळावे । गॅरंटीने ॥

अशी ज्या महोदयांची महती । तयांकडे खुर्च्या चालून येती
सत्ताभ्रमर गुंजारवती । ईर्द गीर्द ॥

कुणी म्हणे ऐशा नरा । घालाव्या कातड्यांच्या पैजारा
समजूनी तारणहारा । दंडवतावे ॥

ऐशी तयांची ख्याती । बाकी कुणी येतीजाती
तरी हे खुर्चीवरीच बैसती । अखंडित ॥

मिका म्हणे हेचि कारण । समाज वा राजकारण
समजोनि सत्ताकारण । आचरिती ॥

३६.

सत्तामेव जयते

म्हणतात जे । माना तेचि खरे
उगा का बरे । घ्यावी शंका ॥

मानिता तयास । नि:शंक ते सत्य
राहसी नित्य । आनंदात ॥

कुणी जी धुरीण । करित कथन
त्यास करोन वंदन । करी दंडवत ॥

उगा नको शंका । सत्या नि तथ्या
सोडाव्या मिथ्या । त्या सवयी ॥

न चालवावी कुठे । आपुली अक्कल
हीच रे शक्कल । काम करी ॥

न उगवता सूर्य । ते म्हणती ती पूर्व
ही संधी अपूर्व । सोडू नये ॥

ते म्हणती तीच । दिशा ती पूर्व
बाळगूनी गर्व । म्हणावे रे ॥

उठ म्हणता उठावे । बस म्हणता बसावे
उगीच न पुसावे । काही बाही ॥

म्हणती तेचि सत्य । विचारसी सवाल
उगा उठवा बवाल । कशासाठी ॥

जयते सत्तामेव । समजा नवा अर्थ
उगा न अनर्थ । घडो द्यावा ॥

न विचारशी प्रश्न । न काढिशी शंका
पिटावा डंका । त्यांचाच ॥

मिटावे डोळे अन । ठेवावा विश्वास
म्हणजे निश्वास । टाकता येई ॥

उगा कशासी टाकिशी । शेपटावरी पाय
मिळवायाचे काय । सांग तुला?

का बनायचे तुज । उगा शंकासुर
म्हणती असुर । तुजलागी ॥

त्यापरि ती श्रेष्ठ । तयांची भक्ती
मिळेल शक्ती । तुजलागी ॥

माना शिरसावंद्य । तयांची उक्ती
हीच रे युक्ती । पुढे जाण्या ॥

कुणी म्हणो भले । गतानुगतिक
परी तेच अगतिक । होती नंतर ॥

सत्ताधीशाची करा । अशी हाजी हाजी
कुणी म्हणो पाजी । दुर्लक्षावे ॥

आपुणच पहावे । आपुलेच हित
तयांचेच गीत । गावे सदा ॥

मिका म्हणे ऐका । न करावा विरोध
नसो अवरोध । जगता या ॥

३७.

पुतळे

उभारा पुतळे । लहान सहान
अथवा महान । जागोजाग ॥

अरे पुतळा पुतळा । भले असो दगडाचा
नसो त्यास वाचा । तरी बहुपयोगी ॥

जरी न कसा हाले । न शके बोलू
राजकारणाचा कोलू । ओढू शके ॥

पुतळे देती शोभा । शहरास कैसे
उपयोगी ऐसे । पडतात ॥

व्यक्तीचे महनीय । घेऊनिया नाम
आपुलाले काम । साधता येई ॥

वर्षातुनी एकच । घालावा तो हार
इतरांवरी प्रहार । करता येई ॥

भाषण ठोकण्या । मिळे संधी नामी
आपुल्याच कामी । येई तीच ॥

पुतळा हा यंव । पुतळा तो त्यंव
इतरांस यंव रे यंव । बोलता येई ॥

पुतळा तो महनीय । पुतळा तो वंदनीय
पुतळा तो स्मरणीय । करावे गुणगान ॥

महनीय व्यक्तीची । जरूरी न शिकवण
नुसतीच आठवण । पुरतसे ॥

बहुदुधी आखुडशिंगी । देई सत्ताकारणास दूध
पुतळ्याचा बोध । हाच असे ॥

कधी हाच पुतळा । विटंबनेस उपयोगी
करू सत्ताभोगी । सळो पळो ॥

पुतळ्यास हार । घालावा खेटरांचा
राजकीय फायद्यांचा । असा हिशेब ॥

कुणी फासावे काळे । कुणी पाडावा थेट
असा लावावा नेट । की घडो दंगल ॥

पुतळ्यास असे जात । पुतळ्यास असे धर्म
असे त्याचे काही कर्म । शोधावेचि ॥

निर्जीव साकार तो । असा येई कामी
देत असे संधी नामी । साधावीच ॥

पुतळा न जिता । भले असो दगडी
राजकारणाची फुगडी । घालता येई ॥

काही पुतळे तरी । असती निरूपद्रवी
कबुतरांच्या उपक्रमी । कामी येती ॥

पाहुनिया पुतळे । पक्षी आनंदी किती
तयांच्या डोईवरती । रममाण ॥

पुतळे न जणू । पक्षी योजना आवास
विकास विलास । एका जागी ॥

अशा पुतळ्यांस । लागते तरी काय?
बहुतेकांस पाय । नसतातचि ॥

हवा एक चौथरा । एक लोखंडी आधार
बहुजनांविन निराधार । असे तोचि ॥

वर्षातुनी एकदाच । घाला अंघोळपांघोळ
स्तुती अघळपघळ । सालाबाद ॥

वर्षातुनी एकदा । घाला हार तुरे
विरोधकांशी कलगी तुरे । करता येत ॥

पुतळा न तो । जणू दुभती गाय
तयांचे करावे काय । हा न प्रश्न ॥

अरे पुतळा पुतळा । ओव्याशिव्यांचा धनी
असे किती गुणी । समजूनी घ्यावे ॥

मिका म्हणे उभारा । पुतळे गावोगावी
आणि गल्लोगल्ली । मोजावी मते ॥

३८.

होयबा व्रत

ऐसे व्हावे राजा । हूनही राजनिष्ठ
तेच असे इष्ट । प्रगतीस ॥

राजा म्हणे तेच । सत्य त्रिकालाबाधित
म्हणोनि साधित । जावे इप्सित ॥

कुणी म्हणो यास । लांगुलचालन
परि नियमाचे पालन । करावेचि ॥

काही म्हणती उगा । लाळघोटेपणा
उगा का स्व कणा । दाखवावा?

उगा स्वमते जाता । होई अपरिमित
हानि स्तिमित । करेलचि ॥

अरे नका पुरवू । जीभ स्व नाकास
जे मिळे विनासायास । सोडावे का?

राजाच दुसरा । असे इश्वरावतार
उगा वेडाचार । नये करू ॥

हो ला म्हणावे हो । हलवावी मुंडी
मग पाताळ धुंडी । करित जावे ॥

सर्वांसी लाडका । होयबा समजा
उगाच गमजा । मारू नये ॥

नका जाऊ उगा । वाहवून स्वत्वे
न अबडंबर तत्वे । माजवावे ॥

कुणी म्हणे कणा । कुणी स्वाभिमान
तरी आपुलाली मान । वाकवावी ॥

विनाशास आमंत्रण । ताठ कणा मान
जितक्या लवकर जाण । तेचि योग्य ॥

कण्याचे आजार । मानेचे विकार
होती भारंभार । न वाकविता ॥

तयांच्या आरोग्यास । हवे वक्र होणे
कमरेतूनि वाकणे । श्रेयस्कर ॥

वाकावे झुकावे । घालावे दंडवत
करा प्रणिपात । राजासीच ॥

तेथ नको काही । उगाच विचार
जडावे विकार । स्वत्वाचे का?

उगा न मिरवावा । पाठीचा तो कणा
काढील तो फणा । कुठेतरी ॥

ताठ कण्याने होई । नुकसान ते किती
याची तर क्षिती । बाळगावीच ॥

तोचि जाई पुढे । जो तयार वाकण्यास
अन हां जी म्हणण्यास । असे अग्रभागी ॥

लांगुचालनी । लाळघोटेपणा करी
असा होयबा बरी । चढे वरवर ॥

ज्यास प्रगतीची आस । असे झरझर
जाणे ज्यास वरवर । त्याने हे पाळावे ॥

अखंड पाळावे । हे होयबाचे व्रत
मग कामाची प्रत । पाहू नये ॥

आपुला वरिष्ठ । तो आपला भगवंत
बाकी नाशवंत । समजा आपण ॥

बदलता वरिष्ठ । भगवंतही बदले
जय जय वदले । तेचि तरती ॥

अशी असावी सदा । प्रगतीची आस
होयबाव्रताची कास । धरावीच ॥

मिका म्हणे होई । ग्यारंटीने प्रगती
यावाचुनी नाही गती । समजावेच ॥

३९.

संतश्रेष्ठ

१.

बडवावे ढोल । वाढवावे मोल
न शब्दांचा तोल । तया लागे ॥

आपुलीच ती महती । सांगावी आपणचि
न जरूरी कोणाची । स्वावलंबे?

उठा, सांगा किती । स्वत:च मोठे
इतर ते खोटे । अध्याहृत ॥

जगाच्या कल्याणा । आपुली विभूती
हे तर सर्वांभूति । नसती गुण ॥

स्वत:च स्वत:ची । करावी लाल
लज्जेने स्व गाल । न रंगू द्यावा ॥

मिका म्हणे असे । तोचि श्रेष्ठ एक
इतर अनेक । न पुरती पासंगी ॥

मिकारामाचे काय । काय असे ते सांगावे
अन्य संताचे सांगावे । निरूपयोगी ॥

मिकाराम देई । सदा ज्ञान व्यवहारी उपयुक्त
इतर संत न संयुक्त । देती टक्कर ॥

मिकाचे काय बोलणे । काय तयाचे चालणे
व्यवहार्य उपदेशिणे । व्यवच्छेदकी ॥

मिकाराम एकचि संत । जाण जो देई शिकवणी
शिकवी गुळणी । घ्यावी कोठे ॥

मिकाराम शिकवीतसे । जगास घडवितसे
अन्यांस तुडवितसे । पायदळी ॥

मिकाराम संत मोठा । असे तो अनन्य

इतरांस अज्ञ । मानावेचि ॥

यावे सकल शरण । मिकारामाचे स्मरण
करावे भजन । संत मिकाचे ॥

हे सांगत स्वत: । संत मिकाराम
इतर हराम । समजावे ॥

मिका म्हणे जग । स्वस्तुती प्रशंसेचे
तेथ विनयाचे । काम नसे ॥

आपुलाचि बोल । इतर ते फोल
आपुलाचि ढोल । बडवावा आवाजी ॥

मिका म्हणे यास । समजावी बढाई न
अरे यावाचून । प्रगती नाही ॥

मिका म्हणे जाण । युग बदलले
स्वमुखेच सांगियले । स्व महत्व ॥

मिकाराम म्हणे । सर्वश्रेष्ठ असे मिका
स्पर्धा अहमहमिका । नसे येथ ॥

२.

मिका संतश्रेष्ठ । मिकाराम एकच
दुसरा कोणीच । न मजसम ॥

इतर ते संतजन । उगा उभारती आदर्शी
परि पथदर्शी । मिका एकचि ॥

कित्येक संतांनी । सांगियले नाही
मिकारामानेच काही । ते सांगियले ॥

मिका म्हणे करा । मिकाचीच भक्ती
आहे हीच युक्ती । स्वर्गसुखाची ॥

मिकाचाचि थेट । ईश्वराशी संपर्क
उगा वाटू नये दर्प । स्वकवतिकाचा ॥

या रे सारे यारे । संत मिकास शरण
वंदावे चरण । तयाचेचि ॥

ध्यानी मनी भजावा । मिकारामा पुजावा
मिळे परतावा । गॅरंटीने ॥

मिकाबुवाची ग्यारंटी । स्वर्गप्रवेशाची मिळे
शंका किंचित न मुळे । असो द्यावी ॥

अशी न देई आॅफर । कुणी संत दुजा
समजावे खुजा । तयांसच ॥

मिका म्हणे मीच । संत नंबर्वन
बाकी सारे जन । विसरावे ॥

असो गर्दी किती । या संतबाजारी
मिकाच्या उपरी । नसे कुणी ॥

कुणी सांगे भक्ती । कुणी म्हणे शक्ती
मिकाराम युक्ती । सांगतसे ॥

तुम्ही जनसामान्य । करावे हे मान्य
मिका असामान्य । संत असे ॥

अध्यात्म मार्केटी । संतगण येती
मिका करे पूर्ती । समस्यांची ॥

भक्तांच्या कारणे । मिकाची विभूती
नका गुंग मती । होऊ द्यावी ॥

मिकाच एक । मिकारामाविण न दुजा
तयाचीच पूजा । बांधित जाशी ॥

ते असती पाया । मिका कळस झालासी
पायाच्या दगडांसी । बरी पायरीच ॥

बोला जयजयकार । संत मिकाचाचि
मीच एकचि । संतश्रेष्ठ ॥

मिकागाथा पठण । मनोभावे श्रवण
करीती दैनंदिन । तरूनी जाती ॥

४०.

संत, बाबा, बुवा इ..

समाजास भूषण । आम्ही संत बुवा बाबा
जावा काशी वा काबा । नाही तोड ॥

भगवंताशी आमुची । थेट असे लाइन
सगळे होई फाइन । आमुच्यामुळे ॥

आम्ही बाबा सज्जन । आम्ही पुण्यवंत
आम्ही असू संत । जगतोद्धारी ॥

जगाच्या कल्याणा । आमुच्या विभूती
ऐसे गुण गाती । भक्तगण ॥

आमुच्या आश्रमी । गर्दी अलोट
धरावया बोट । आमुचेचि ॥

आम्ही देऊ ग्यारंटी । पुढील जन्माची
पुण्याई गतजन्माची । भेटलो आम्ही ॥

या जन्मी करावी । भक्तिची बेगमी
तयाच्या उद्गमी । असू आम्ही ॥

घ्यावे ते अखंड । आमुचेचि नाम
हेचि एक काम । तारी तुम्हा ॥

न लगे करणे वेगळी । भक्ती भगवंताची
वट ती आमची । देवदरबारी ॥

भगवानाचे असू । आम्हीच एक दूत
धरावी अध्याहृत । मुक्ती तुम्ही ॥

कोठे कोठे देव पुरा । पडे भक्तांसी
म्हणूनचि आम्हांसी । धाडि येथ ॥

आमुचि भक्ती । असे असा शा◌ॅर्टकट
नको कटकट । ओरिजिनल भक्तिची ॥

देती सुख समाधान । बाबा बुवा संत
नसो तयांचा अंत । या जन्मी ॥

ओरिजनल देवास लागे । भक्तिभाव म्हणे
आम्ही अधिक उणे । चालवुनि घेऊ ॥

आमचे येथे नसे । भक्तिभावाची सक्ती
तयावाचुनि ही मुक्ती । आम्ही देऊ ॥

कवडी दमडीच । असे इथले चलन
उगा भक्तीचे दळण । न दळू आम्ही ॥

आमची करा भक्ति । बाबाबुवा नाम जप
करा व्रत तप । यथासांग ॥

साऱ्याच व्रतांची । करावी सांगता
द्यावी न सांगता । दक्षिणा भक्कम ॥

धनाने मोजिली जाई । येथ तुमची श्रद्धा
भोळ्याभक्तीचा फंदा । नसे येथ ॥

आम्ही बुवाबाबा संत । आलो जनतेच्या साठी
आमुच्याच पाठी । असे भगवंत ॥

आम्ही एकमेव एजंट । जगन्नियंत्याचे
त्या अभियंत्याचे । करावे कौतुक ॥

सारी निर्मिली सृष्टी । मग निर्मियले आम्हा
जगतोद्धाराच्या कामा । लागू आम्ही ॥

देव ओरिजिनल । कुणी न पाहिला
म्हणे भरोन राहिला । चराचरी ॥

पण आम्ही बुवा संत । असु असे दृश्य
नव्हे अदृश्य । त्या भगवंता सम ॥

कुणा ठावे कशी । दिसे खरी भक्ती
आम्ही गॅरंटीड मुक्ती । देतो येथे ॥

उगा न जाता त्या । निर्गुण निराकारापाठी
आम्हा साकारांपाठी । यावे जनांनो ॥

तुमच्याच कल्याणा । आम्ही संत बाबा बुवा
मिळे गॅरंटीड मालपुवा । पुण्याचा ॥

असो इतके सारे संत । इतके बुवा बाबा
काँपिटिशन इथे बाबा । फार झाली ॥

किती तो फरक । मिका अन इतरांत
आणिक त्याच्यात । मिका ग्रेट ॥

मिकाराम देई । सर्वाधिक हमी
कसलीच कमी । न पडू देई ॥

इतर संतही तसे । असती बरेच बरे
काही काही खरे । असती ही ॥

तरी ही म्हणे मिका । इतर संतांत
मिकाराम एकचि संत । सर्वश्रेष्ठ ॥

न जुन्यापुराण्या संतांत । न आताच्या बाबांत
मिकारामासम न संत । दुजा कोणी!

॥इति श्री मिकाराम गाथा चाळीशी संपूर्णम॥

डॉ. नितीन मोरे

यांची

५९+२(ऑडिओ)

प्रकाशित पुस्तके












डॉ. नितीन मोरे
२ अंकी बालनाट्य

लाडेबा
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास

मिशन
ब्र
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक


डॉ. नितीन मोरे
तिसऱ्या घंटाच्या गंमती

डॉ. नितीन मोरे
खेळ आकड्यांचे प्रेमाचे

एका डॉक्टरची कोविडकथा
डॉ. आबाजी पटवे
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे
बोलतो तर बोलाल की बोलतो

चक्रमादित्य भाग १ ते ५









डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0

डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I

डॉ. नितीन मोरे
एका
नाटकाची
गोष्ट!


डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी


डॉ. नितीन मोरे
ऐसाही होता है

डॉ. विनोद मोरे

डॉ. नितीन मोरे
सदू
आणि
कादू

डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ४
कर्ण.. जाड्या.. चक्रधर..इ..

डॉ. नितीन मोरे
ग.ग.इ.या (ग्रेस) कविता

डॉ. नितीन मोरे
वाळूतील पेटा


राग दरबारी

डॉ. नितीन मोरे
अहन
बहास्मि

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या

प्रिय पत्रास,

डॉ. नितीन मोरे
भ्रष्टाचार

डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाकाबंदी
सांगतो ऐक

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..


डॉ. नितीन मोरे
कविता

डॉ. नितीन मोरे
मी मेल्याविना बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याविना बोलते

अंजनाईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याविना बोलते
अभिवाचक व लेखन : अंजना लगस

डॉ. नितीन मोरे
'इक्का' गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा

डॉ. नितीन मोरे
ऐसे अक्षरे

जॅक्सन...
Jackson!

सुलट उलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!
(अर्थात कविता २ इज्म)

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष
डॉ. नितीन मोरे यांचे हे साठावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (**६०पुस्तके**), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२५), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा

(जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१४), डॉ. वृषाली जोशी (**५९ पुस्तके**), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (४), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१३), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (३०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (३), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे(), सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(९), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(३), कैलास बडगुजर, अंजुषा पाटील प्रा श्रीपाद काळे(८), चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक, प्रमोद नाईकवाडॅे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, सुरेश पंधारे, श्रेणीक सारडॅे(६), दिलिप ठाकूर, विश्वनाथ मानकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahlty@gmall.com

www.esahlty.com

9869674820 (for free books on whatsapp)